सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

10वी- 12वी उत्तीर्णांसाठी सुवर्णसंधी, सर्वोच्च न्यायालयात बंपर भरती; साठ हजारांहून अधिक असेल पगार

नवी दिल्ली: सुप्रीम कोर्टामध्ये तरूणांना नोकरी करण्याची संधी आहे. वेगवेगळ्या रिक्त पदांसाठी सुप्रीम कोर्टामध्ये नोकरभरती केली जाणार आहे. त्यामुळे जर तुम्ही देखील सरकारी नोकरीच्या शोधात असाल तर, ही महत्त्वाची बातमी तुमच्यासाठी आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयामध्ये 130 रिक्त पदांसाठी भरती केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारित काम करण्याची संधी हव्या असणाऱ्या गरजू आणि पात्र उमेदवारांसाठी ही एक अत्यंत महत्त्वाची संधी आहे.

भारतीय सर्वोच्च न्यायालयामध्ये, 'ज्युनिअर कोर्ट अटेंडंट' (Junior Court Atendant) पदासाठी एकूण 130 रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या पदासाठी जर तुम्हाला अर्ज भरायची इच्छा असेल तर, तुमच्याकडे सरकारी मान्यताप्राप्त मंडळातून किमान दहावी ते बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या सर्व शैक्षणिक पात्रता असणाऱ्या कोर्सेसचं तुमच्याकडे सर्टिफिकेट असणंही महत्त्वाचं आहे. उमेदवाराचं वय 01 ऑक्टोबर 2026 रोजी 18 ते 27 वर्षांदरम्यान असावे. शासकीय नियमांनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादेत सूट देण्यात आली आहे, अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) उमेदवारांना 05 वर्षे, तर इतर मागासवर्गीय (OBC) उमेदवारांना 03 वर्षांची सूट देण्यात आली आहे.

16 ऑक्टोबर 2026 पासून अर्थात आजपासून सुरू झालेल्या ह्या भरती प्रक्रियेचा शेवटचा दिवस 25 नोव्हेंबर 2026 हा शेवटचा दिवस असेल. ऑनलाईन पद्धतीने उमेदवारांना अर्ज भरावा लागणार आहे. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्गीय (OBC), दिव्यांग व्यक्ती (PwDs) आणि माजी सैनिक (ExSM) या उमेदवारांना ₹750 फी असेल, तर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना ₹1500 फी भरावी लागणार आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना दिल्लीमध्ये नियुक्ती दिली जाईल. 'ज्युनिअर कोर्ट असिस्टंट' वेतनाविषयी सांगायचे तर, 'पे मॅट्रिक्स'च्या लेव्हल 3 नुसार 21,700 रुपये ते 69,100 रुपये दरम्यान वेतनश्रेणी असेल. यामध्ये सुरुवातीचे मूळ वेतन (Basic Pay) 21,700 रुपये अधिक नियमानुसार इतर सरकारी भत्तांचा समावेश असेल. दरम्यान, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने परिक्षेची तारीख सुद्धा जाहीर केलेली आहे. परिक्षेची तारीख 26 डिसेंबर 2026 असेल. याची परिक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

दुष्काळग्रस्त बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या देवाभाऊंचे मन:पूर्वक अभिनंदन! -ॲड. किशोर देशमुख

तभा वृतसेवा

अर्धापूर, दि. १६ ऑक्टोबर - महाराष्ट्रावर भीषण दुष्काळाचे संकट असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ रुपयांची अग्रिम आर्थिक मदत देण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच दिलासादायक आहे.

कितीही आर्थिक मदत केली, तरी दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पूर्णपणे भरून निघणार नाही. बळीराजाने घेतलेले कष्ट, वाया गेलेले पीक आणि त्याच्यावर आलेले आर्थिक संकट याची भरपाई केवळ पैशांत होऊ शकत नाही. मात्र संकटाच्या काळात सरकार आपल्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास शेतकऱ्यांसाठी मोठा आधार असल्याची प्रतिक्रिया भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांनी व्यक्त केली.

राज्यातील महायुती सरकारने यापूर्वीही शेतकऱ्यांना कर्जमाफी, पिकविमा,कृषी पंपांच्या ४८००० कोटी वीजबिल माफी , दुष्काळ घोषित तालुक्यात कर्जवसुलीच्या तगाद्यापासून संरक्षण अशा अनेक निर्णयांद्वारे मदतीचा हात दिला आहे. तसेच पीएम किसान सन्मान निधीसोबत राज्य सरकारच्या सहभागातून नमो शेतकरी महासन्मान निधीच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचे काम सुरू आहे. तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा फीस माफ केली आहे.

दुष्काळात दिवाळीपूर्वी ५ हजाराची ही मदत अंतिम मदत नसून अग्रिम मदत आहे. पुढील पंचनामे व शासनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचा योग्य आढावा घेऊन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक दिलासा देण्यासाठी देवाभाऊंचे सरकार निश्चितपणे पुढाकार घेईल, असा मला ठाम विश्वास आहे.सध्या यासाठी ६ हजार कोटी रु तस्तूद करण्यात आली आहे. दरम्यान, दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीच्या बाबतीत महाराष्ट्र आणि कर्नाटकातील उपाययोजनांची तुलना करणेही आवश्यक आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी ५ हजाराची अग्रिम मदत जाहीर करण्यात आली असताना, कर्नाटक सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदतीबाबत वेगळी भूमिका घेतली आहे. त्यामुळे संकटाच्या काळात शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने स्वतःच्या स्तरावर घेतलेल्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होते. दुष्काळ हा राजकारणाचा विषय नसून बळीराजाच्या जगण्याचा प्रश्न आहे. या कठीण काळात सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. ङ्गशेतकरी सुखी तर महाराष्ट्र सुखीङ्ग या भावनेतून बळीराजाला संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या देवाभाऊंच्या सरकारवर शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख म्हणाले.

आदमपूर येथे रामतीर्थ पोलिसांची तिरट जुगार अड्ड्यावर धाड ; 23 जुगारीसह पावणे नऊ लाखाचे मुद्देमाल जप्त

नांदेड- गतवर्षी त्याच आदमपूर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र परिसरातील इमारतीच्या तळघरात सुरू असलेल्या जुगाराड्यावर गत वर्षी २ ऑक्टोबर २०२५ रोजी दसऱ्या दिवशी मध्यरात्री रामतीर्थ पोलिसांनी तिरट नावाच्या जुगार अड्ड्यावर तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक धाड टाकत अनेकांना सोडून देत जुगार अड्डा चालकासह इतर तीन लोकांवर गुन्हा दाखल केला होता. परत त्याच ठिकाणी १५ रोजी मध्यरात्री रामतीर्थ पोलिसांनी परत एकदा जुगार आल्यावर धाड टाकली आहे.

बिलोली- तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या आदमपूर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र परिसरातील एका घराच्या तळमजल्यात तिरट नावाचा जुगार सुरू असल्याच्या गोपनीय माहितीवरून १५ रोजी मध्यरात्री १ च्या सुमारास रामतीर्थ पोलिसांनी धाड टाकत ८ लाख ७६ हजार ६६० रुपयेचा मुद्दे माल जप्त करत २३ लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

आदमपूर बिलोली रोड लगत असलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात परिसरातील एका इमारतीच्या तळघरात आदमपूरसह गळेगाव, थडीसावळी, अटकळी येथील तिरट नावाचा जुगार खेळत होते. याची गोपनीय माहिती रामतीर्थ पोलिस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे यांना मिळाल्यावरून त्यांनी त्या ठिकाणी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेत १५ रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास धाड टाकत धाडीत जुगारातील पत्ते, रोकड व प्रत्येकाची झाडा झडती घेत त्यांच्याकडली संपूर्ण रक्कम त्यांच्याकडील मोबाईल फोन एका पोत्यात भरण्यात आले. पोत्यात भरताना खूप मोठी रक्कम जमा झाल्याचे सांगण्यात येत होते. परंतु पोलीस डायरीत पोलिसांनी केवळ ४१ हजार रुपयाची रोकडची नोंद केली आहे. पैशाने व मोबाईलने भरलेला पोत्यासह जुगार चालक व सर्व जुगारी लोकांना १ क्रुझरने दोन फेरीत पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

नंतर जुगारी लोकांचे ९ मोटरसायकली ही रामतीर्थ पोलीस ठाण्यात आणून लावण्यात आले. परंतु या जुगारी धाडीत जुगार खेळणाऱ्यापैकी केरूर येथील एका शिक्षकासह इतर एकास व गळेगाव येथील अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल न करता सोडून दिल्याची चर्चा मात्र परिसरात सुरू आहे.

संक्षिप्त...

रात्रीची लोडशेडींग बंद करा; सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांचे महावितरणला निवेदन

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ : फ्रिक्वेन्सी कमी झाल्याच्या नावाखाली शिरूर अनंतपाळ तालुक्यात रात्रीच्या वेळी करण्यात येत असलेले लोडशेडिंग तात्काळ बंद करावे, या मागणीसाठी सर्वपक्षीय पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी महावितरणच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती आहे. शेतीची कामे ठप्प झाली आहेत. अशातच महावितरणकडून रात्री ६ ते सकाळी ९ वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडित केला जात आहे. त्यामुळे अंधाराचा फायदा घेऊन चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे.

गेल्या काही दिवसात शिरूर अनंतपाळ शहरासह लक्कडजवळगा,येरोळ, रापका, हिप्पळगाव, थेरगाव,साकोळ , उजेड परिसरात शेतातील मोटारी, केबल, ठिबक साहित्य आणि घरासमोरील दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पोलिसांची रात्रीची गस्त कमी असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

रात्रीच्या लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे कठीण झाले आहे. साप-विंचू आणि वन्यप्राण्यांचा धोका वाढला असून, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे.त्यामुळे निलंगा १३२केव्ही वरुन शिरूर अनंतपाळ तालुक्याला होणारा सप्लाय नव्याने तयार झालेल्या अजणी येथील १३२केव्ही वरून करण्यात यावा अशी मागणी तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

त्यामुळे रात्रीचे लोडशेडिंग बंद करून, गरज असल्यास दिवसा लोडशेडिंग करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. येत्या ८ दिवसात निर्णय न झाल्यास सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदन प्रसंगी भाजपचे माजी सभापती धोंडीराम सांगवे, अतुल माने पाटील, गोविंदराव चिलकुरे, माजी सभापती गोविंद आबा पोतदार,रयत क्रांती सेनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव पेठे, संग्राम हवा,यांच्यासह सर्व पक्षाचे पदाधिकारी, शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. अभिमन्यू पवारांची धडपड कौतुकास्पद : ह.भ.प. माकणीकर महाराज

निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या ४३व्या गळीत हंगामाच्या शुभारंभ

तभा वृत्तसेवा

औसा दि.१६ ऑंक्टोंबर - कर्जाच्या ओझ्यामुळे बंद पडलेला साखर कारखाना सुरू करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आर्थिक सहकार्यातून पुन्हा एकदा नव्या दमाने सुरू करण्यात आला.याचबरोबर शेतकऱ्यांच्या उसाला अधिकचा दर मिळावा. यासाठी उपपदार्थ निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आमदार अभिमन्यू पवार यांची धडपड कौतुकास्पद आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी निळकंठेश्र्वर साखर कारखान्याला ऊस द्यावा.असे आवाहन ह.भ.प. महेश महाराज माकणीकर यांनी केले.

किल्लारी येथील श्री निळकंठेश्र्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेडच्या सन २०२६-२७ च्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ गुरुवर दि. १५ रोजी ह.भ.प. महेश महाराज माकणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.आ. अभिमन्यू पवार, सभापती चंद्रशेखर सोनवणे, संतोष मुक्ता, काकासाहेब मोरे, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड परिक्षित पवार, गोविंद भोसले,शरद भोसले, कार्यकारी संचालक डी.एल. पतंगे, प्रकाश पाटील, सतीश भोसले,राम पाटील, गौरीशंकर बालकुंदे,संकट पाटील,नाना धुमाळ, बळीराम पाटील,ओम बिराजदार, परमेश्र्वर धुमाळ, सिध्देश्र्वर बालकुंदे उपस्थित होते.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, निळकंठेश्र्वर साखर कारखाना सुरू करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. कारखान्याची आर्थिक परिस्थिती आणि मालमत्तेवरील कर्जाचा बोजा यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे कारखाना पुन्हा सुरू करणे शक्य झाले. निळकंठेश्र्वराच्या कृपेने कारखान्याची प्रगती सुरू असून, शेतकऱ्यांनी आपलाच कारखाना समजून जास्तीत जास्त ऊस गाळपासाठी द्यावा. आगामी काळात उपपदार्थ निर्मितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक ऊसदर देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

ह.भ.प. महेश महाराज माकणीकर म्हणाले, साखर कारखाना उभारणे आणि तो चालविणे किती अवघड असते, याची जाणीव कारखान्याच्या परिस्थितीचा विचार केल्यानंतर होते. कारखान्याची जमीन आणि आर्थिक अडचणी असतानाही नवीन स्वतंत्र कारखाना उभारण्याऐवजी सर्व शेतकऱ्यांच्या हितासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी किल्लारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. त्यांच्या पाठीशी श्री निळकंठेश्र्वर आणि श्री पंढरीनाथ यांची कृपा आहे. समाजातील सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची भावना आणि सर्वांचे हित साधण्याचा दृष्टिकोन त्यांच्या कार्यातून दिसून येतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

सध्याच्या काळात अनियमित पाऊस आणि पिकांची घटती उत्पादकता यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याबाबत शेतकऱ्यांनी अभ्यास करावा. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची मदत घेऊन शेतीत प्रगती साधावी. तसेच कारखान्याच्या गळीत हंगामात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन महेश महाराज यांनी केले.

मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊस पुरवठा करणारे महादेव दादाराव भोसले, मुरलीधर मारुती लोमटे, ज्ञानेश्र्वर विक्रम मनाळे, राम मारुती माने आणि राम विश्र्वंभर गांजनखेडे पवार (करजगाव) या शेतकऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.यावेळी सभासद शेतकरी, ऊस उत्पादक शेतकरी व गावकरी उपस्थित होते.

शेतकरी, विद्यार्थी व पदवीधर संवाद मेळावा उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

देवणी दि. १६ ऑक्टोबर : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने देवणी येथे शेतकरी, विद्यार्थी आणि पदवीधर संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष निखिल ठाकरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ड. व्यंकटराव बेद्रे होते. देवणी पंचायत समितीचे सदस्य तथा मेळाव्याचे आयोजक गजानन भोपणीकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला शेतकरी, विद्यार्थी, पदवीधर आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश कार्यालयीन सरचिटणीस अमर पाटील, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे लातूर जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, जिल्हा परिषद लातूरचे बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, सांस्कृतिक विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजित आवटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे देवणी तालुकाध्यक्ष प्रा. डॉ. अनिल इंगोले, जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, शफी हाश्मी, शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे उपसभापती खंडेराव चव्हाण, शिरूर अनंतपाळ राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अनिल देवगरे, अजीज मुल्ला, निलंगा तालुकाध्यक्ष हरिदास साळुंखे, रोहित पाटील, शिरूर अनंतपाळ ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष तुकाराम काळे, हिपळगावचे सरपंच तथा लातूर जिल्हा ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्र्वर मोगले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक गजानन भोपणीकर यांनी केले. यावेळी त्यांनी देवणी तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या हितासाठी पक्षाच्या माध्यमातून एकजुटीने प्रयत्न करण्याची भूमिका मांडली. आगामी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सतीशभाऊ चव्हाण यांना बहुमताने विजयी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

निलंगा नगर परिषदेचा १० टक्के पाणीकपातीचा निर्णय; पाणी जपून वापरण्याचे प्रशासनाचे आवाहन

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १६ ऑक्टोबर : पावसाळ्यात अत्य अल्प पाऊस झाल्यामुळे पाणी साठ्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.त्यामुळे लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे.. या पार्श्र्वभूमीवर, आगामी काळातील पाणीप्रश्र्न गंभीर होऊ नये म्हणून निलंगा नगर परिषद प्रशासनाने १६ ऑक्टोबर २०२६ पासून शहराच्या पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. परिणामी, नागरिकांना यापुढे पूर्वीच्या ९० मिनिटांऐवजी केवळ ८० मिनिटेच पाणी दिले जाणार आहे. म्हणून निलंगा शहरातील नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करावा असे आवाहन निलंगा नगर परिषदेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर व मुख्याधिकारी संतोष लोमटे यांनी केले आहे

शहराला निम्न तेरणा प्रकल्पांतर्गत माकणी धरणातून पाणीपुरवठा होतो. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाल्याने धरणात सध्या केवळ १८.४४ दशलक्ष घनमीटर (२०.२१ टक्के) पाणीसाठा शिल्लक आहे. हा साठा थेट ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरवणे प्रशासनासाठी आव्हानात्मक आहे. राज्य शासनाच्या ५ ऑक्टोबर २०२६ च्या आदेशानुसार पाणी बचतीच्या उपाययोजना म्हणून ही कपात लागू करण्यात आली आहे. शहरात सध्या तीन दिवसांआड पाणीपुरवठा होतो. या कपातीमुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाण्याचा अपव्यय केल्यास किंवा पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त पाण्यासाठी दबाव आणल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

पाणीटंचाईचे गांभीर्य ओळखून नगर परिषदेने नागरिकांना सहकार्यासाठी आवाहन केले आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निर्धारित वेळेपेक्षा जास्त पाणी सोडण्यासाठी कोणताही आग्रह करू नये. तसेच, नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवणाऱ्यांवर किंवा नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा कडक इशाराही नगर परिषद प्रशासनाने दिला आहे.

नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा

यंदा कमी पर्जन्यमानामुळे निम्न तेरणा प्रकल्पातील माकणी धरणात मर्यादित पाणीसाठा उपलब्ध आहे. हा साठा ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरविण्याच्या दृष्टीने शासनाच्या निर्देशानुसार १६ ऑक्टोबरपासून निलंगा शहरात १० टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना पूर्वीच्या ९० मिनिटांऐवजी आता ८० मिनिटे पाणीपुरवठा केला जाईल. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि पाणीपुरवठा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निर्धारित वेळेपेक्षा जास्त पाणी सोडण्याचा आग्रह करू नये. उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

संतोष लोमटे, मुख्याधिकारी, नगर परिषद, निलंगा

जनमाता देवीच्या नवरात्रोत्सवात मानवसेवेचा जागर !

आज रक्तदान, थॅलेसेमिया तपासणी, हेल्मेट वाटप; क्षयरोगमुक्त समाजासाठी ही जनजागृती

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १६ ऑक्टोबर : नवरात्रोत्सव म्हटले की भक्ती, श्रद्धा आणि शक्तीची उपासना; मात्र याच भक्तीला मानवसेवेची जोड मिळाली, तर धार्मिक उत्सवाचे सामाजिक चळवळीत रूपांतर होते. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून हाळी खुर्द (खुर्दळी) येथील श्री जनमाता आई देवस्थान विश्र्वस्त मंडळाने आरोग्य, रस्ते सुरक्षा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या उपक्रमांत भव्य रक्तदान शिबिर, १८ ते ३० वर्षे वयोगटातील अविवाहित तरुण-तरुणींसाठी थॅलेसेमिया तपासणी, हेल्मेट वाटप आणि क्षयरोग जनजागृतीचा समावेश आहे. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हा सेवायज्ञ पार पडणार आहे.

रक्तदान करा; एखाद्याच्या आयुष्याला नवी संधी द्या!

अपघात, मोठ्या शस्त्रक्रिया, प्रसूतीतील गुंतागुंत किंवा काही गंभीर आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासते. अशा वेळी रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध असणे म्हणजे रुग्णासाठी जीवनाची आशा असते. रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी या जीवनदायी कार्यात सहभागी व्हावे, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश आहे. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

थॅलेसेमियाबाबत वेळीच जागे व्हा!

थॅलेसेमिया हा आनुवंशिक रक्तविकार असून, त्याविषयी योग्य माहिती आणि वैद्यकीय मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. विशेषतः विवाहपूर्व आरोग्य तपासणी आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याचे महत्त्व लक्षात घेता, १८ ते ३० वर्षे वयोगटातील अविवाहित तरुण-तरुणींसाठी थॅलेसेमिया तपासणीचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

हेल्मेट वापरा; कुटुंबाचा आधार सुरक्षित ठेवा!

दुचाकी अपघातांमध्ये डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतींचा धोका कमी करण्यासाठी दर्जेदार हेल्मेटचा योग्य वापर महत्त्वाचा आहे. हेल्मेट जवळ बाळगणे नव्हे, तर प्रत्येक प्रवासात ते योग्य पद्धतीने परिधान करणे आवश्यक आहे. याच रस्ते सुरक्षा संदेशासाठी श्री जनमाता आई देवस्थान विश्र्वस्त मंडळ व चाकूर पोलीस स्टेशन यांच्या वतीने हेल्मेट वाटप करण्यात येणार आहे.

वाहतुकीचे नियम पाळणे आणि हेल्मेट वापरणे ही केवळ कायद्याची अट नाही; ती स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे. अपघातानंतर पश्र्चात्ताप करण्यापेक्षा अपघातापूर्वी काळजी घेण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

क्षयरोगाविरुद्ध लढा; लक्षणे लपवू नका!

क्षयरोगाविषयी असलेले गैरसमज, भीती आणि सामाजिक कलंक दूर करणे ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची गरज आहे. महाराष्ट्र शासनाच्या लातूर जिल्हा क्षयरोग विभागामार्फत या उपक्रमांतर्गत क्षयरोग जनजागृती करण्यात येणार आहे. दीर्घकाळ खोकला, ताप, रात्री घाम येणे किंवा वजन कमी होणे यांसारखी लक्षणे दिसल्यास वैद्यकीय तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे. क्षयरोगाचे निदान झाल्यास निर्धारित उपचार पूर्ण करणे आवश्यक असून, योग्य उपचारांनी हा आजार बरा होऊ शकतो.

या सामाजिक उपक्रमात रक्तदाते, युवक-युवती, महिला, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री जनमाता आई देवस्थान विश्र्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय संशोधन महोत्सवात शिवलिगेश्वर फार्मसीने ७ पदकं पटकावली

तभा वृत्तसेवा

औसा दि.१६ ऑंक्टोंबर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पेठ उपकेंद्रात आयोजित 'जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव २०२६-२७' मध्ये औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सलग दुसऱ्या वर्षी यशाची परंपरा कायम राखत या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध संशोधन व सृजनशील सादरीकरणांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत एकूण ७ पारितोषिके पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध विद्या शाखांमध्ये मिळवलेले यश उल्लेखनीय असून मानव्यशास्त्र पदवी गटातून भाषा आणि ललित कला विभागात अनुष्का भोसले प्रथम आली आहे.वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा विभागात अमरजीत पाटील पदवी गटातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. कृषी आणि पशुसंवर्धन विभागात सोहम उलागड्डे प्रथम ,अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागात श्रद्धा कापसे प्रथम, गौतम दुर्गम प्रथम, ओंकार कोटगीरे तृतीय, वैद्यकशास्त्र आणि औषध निर्माणशास्त्र विभाग: यश मोरे द्वितीय आला आहे.

डाँ. व्ही. एम. धाराशिवे, डाँ एस .एस. कुलकर्णी, डाँ. ए. बी. गिरी, डाँ. व्ही. बी. वडेवाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसीचा संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील अग्रक्रम पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे.

या यशाबद्दल विद्यार्थी आणि मार्गदर्शक प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्र्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

केंद्र स्तरीय बाल विज्ञान प्रदर्शनात अवंतिका सांगवे हिचा तृतीय क्रमांक

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि.१६ ऑक्टोबर : येथे आयोजित केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयाची विद्यार्थिनी अवंतिका अनंत सांगवे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

या विज्ञान प्रदर्शनात रामराव पाटील विद्यालयाच्या अवंतिका अनंत सांगवे आणि अक्षरा अनंत पाटील या दोन विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विज्ञान विषयातील जिज्ञासा, कल्पकता आणि विद्यार्थिनींच्या मेहनतीला या प्रदर्शनाच्या माध्यमातून व्यासपीठ मिळाले. अवंतिका सांगवे हिने तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल तिला सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या दोन्ही विद्यार्थिनींना दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयातील बनसोडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींना विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्याची आणि आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली.

कलाल कलार महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी व्यंकट तेलंग यांची निवड

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. १६ ऑक्टोबर : अखिल भारतीय कलवार कलाल कलार महासभेच्या जिल्हा अध्यक्षपदी जळकोटचे माजी नगराध्यक्ष व्यंकट किशनराव तेलंग यांची नुकतीच निवड झाली असून त्यांच्या या निवडीबद्दल जळकोट येथील समाजबांधवांच्या वतीने व मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला

तुळजापूरच्या पायी जाणाऱ्या भाविकांसाठी येरोळमोड येथे अन्नदानाचा उपक्रम

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि.१६ ऑक्टोबर : तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने येरोळमोड येथील परी मेडिकलचे प्रो. प्रा. शिवानंद सुगावे यांच्या तर्फे गेल्या पाच वर्षांपासून प्रतिवर्षी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाही कृष्णा हॉटेल, येरोळमोडसमोर पायी जाणाऱ्या भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली.

पायी प्रवास करणाऱ्या भाविकांना प्रवासादरम्यान अन्नाची मदत मिळावी आणि त्यांच्या धार्मिक प्रवासात हातभार लागावा, या भावनेतून हा उपक्रम सुरू ठेवण्यात आला आहे. श्रद्धा, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम असलेल्या या उपक्रमातून सुगावे यांनी भाविकांप्रती आपली सेवाभावी वृत्ती जपली आहे.

धार्मिक यात्रेच्या काळात अनेक भाविक लांबचा पल्ला पायी पार करतात. अशा वेळी त्यांना अन्नदानाच्या माध्यमातून मदत मिळणे महत्त्वाचे ठरते. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबवून परी मेडिकलच्या वतीने सामाजिक सेवेचा आदर्श निर्माण केला जात आहे.

भाविकांची सेवा हीच ईश्र्वरसेवा या भावनेतून राबविण्यात येणारा हा उपक्रम भाविकांसाठी निश्र्चितच दिलासादायक ठरत आहे.

संयुक्त उपक्रमासाठी सामंजस्य करार

नवी दिल्ली: अदाणी समूहाची प्रमुख कंपनी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) आणि जागतिक अभियांत्रिकी, पुरवठा साखळी व उत्पादन क्षेत्रातील कंपनी जॅबिल आयएनसी. (एनवायएसई: जेबीएल) यांनी भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सेंटर उपकरणांचे उत्पादन व असेंब्ली करण्यासाठी प्रस्तावित ५०:५० संयुक्त उपक्रमाची रूपरेषा निश्चित करणाऱ्या बंधनकारक नसलेल्या सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षऱ्या केल्या आहेत.प्रस्तावित संयुक्त उपक्रमासाठी अंतिम करारांची अंमलबजावणी, लागू असलेल्या आवश्यक मंजुरी मिळवणे आणि प्रचलित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

पारेषण जाळ्याला रेसोनियाचे बळ

मुंबई - भारताचे स्वच्छ ऊर्जा संक्रमण केवळ अक्षय ऊर्जेची निर्मिती करण्यावर अवलंबून नाही, तर ही वीज विविध प्रदेशांमध्ये विश्वासार्हपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीवरही अवलंबून आहे. 2030 पर्यंत 500 गिगावॅटस्थापित बिगर-जीवाश्म इंधनाधारित वीज निर्मिती क्षमतेचे लक्ष्य भारताने निश्चित केले असताना, अक्षय ऊर्जा स्रोतांपासून निर्माण होणारी वीज घरे, उद्योग, व्यवसाय आणि समुदायांपर्यंत पोहोचवण्यासाठी पारेषण यंत्रणांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. खावडा आईवी-सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड च्या माध्यमातून रेसोनिया लिमिटेड गुजरातमधील खावडा येथील अक्षय ऊर्जा केंद्राला महाराष्ट्रातील पडघा यांच्याशी जोडणारी एक महत्त्वपूर्ण वीज पारेषण वाहिनी विकसित करत आहे. महाराष्ट्राच्या बदलत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि भारताच्या स्वच्छ ऊर्जा भविष्याकरिता आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी सक्षम वीज जाळे किती महत्त्वाचे आहे, हे या प्रकल्पातून अधोरेखित होते.

टोयोटा किर्लोस्कर मोटरने सादर केली नवी टोयोटा ग्लान्झा

नवी दिल्ली: टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज नव्या टोयोटा ग्लान्झाच्या लॉन्चची घोषणा केली. नव्या भारतातील बदलत्या आकांक्षा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेली ही स्टायलिश, फीचर्सनी परिपूर्ण आणि उत्कृष्ट मूल्य देणारी हॅचबॅक आहे. मागील पिढीच्या यशाला पुढे नेत, या नव्या मॉडेलमध्ये आकर्षक, अधिक शार्प आणि स्पोर्टी डिझाइन, प्रीमियम इंटिरियर्स, प्रगत कनेक्टिव्हिटी, अधिक सोयीस्कर फीचर्स आणि सर्वसमावेशक सुरक्षा टेक्नॉलजीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे प्रत्येक प्रवासाचा अनुभव अधिक समृद्ध होतो."व्हॉट्टा मूव्ह" या मोहीमेच्या संकल्पनेपासून प्रेरणा घेत, नवी टोयोटा ग्लान्झा ही शहरी तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन करण्यात आली आहे. नव्या टोयोटा ग्लान्झासाठी बुकिंग आता ₹11,000 मध्ये सुरू झाले असून, तिची किंमत ₹6,99,000 (एक्स-शोरूम) पासून सुरू होते.

एआय प्लस स्मार्टफोनकडून तंत्रज्ञान आणि सेवेत सुधारणा

मुंबई : एआय प्लस स्मार्टफोन ग्राहकांच्या अभिप्रायाच्या आधारे उत्पादनांची गुणवत्ता आणि विक्रीपश्चात सेवा सुधारण्यावर भर देत आहे. कॅमेरा स्थिरता, कनेक्टिव्हिटी आणि कार्यक्षमतेसंबंधीच्या समस्यांवर सॉफ्टवेअर अपडेट्स आणि अधिक कठोर चाचण्यांद्वारे उपाय केले जात आहेत. 'प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू' उपक्रमांतर्गत परीक्षक, पत्रकार, क्रिएटर्स आणि तंत्रज्ञानप्रेमींकडून आतापर्यंत एक हजारांहून अधिक नोंदणी झाल्या आहेत. ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण साधारणतः तीन ते चार दिवसांत करण्याचे उद्दिष्ट ब्रँडने ठेवले आहे. ग्राहकांच्या सूचना उत्पादन विकासात समाविष्ट करून अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि समाधानकारक अनुभव देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

पिकांतील तणांच्या प्रभावी नियंत्रणासाठी 'टेम्बोट्रैक्स' सादर

नवी दिल्ली, ऑक्टोबर 16, 2026: भारतातील आघाडीच्या कृषी-निविष्ठा कंपन्यांपैकी एक असलेल्या धानुका एग्रीटेक लिमिटेडने भारतातील प्रमुख कृषी क्षेत्रांमध्ये मका आणि ऊस पिकांतील तण व्यवस्थापनासाठी 'टेम्बोट्रैक्स' हे तणनाशक सादर केले आहे. टेम्बोट्रिओन 34.4% एससीहा सक्रिय घटक असलेले हे तणनाशक पिकांच्या उगवणीनंतरच्या सुरुवातीच्या टप्प्यातील तण नियंत्रणासाठी वापरण्यासाठी विकसित करण्यात आले आहे.टेम्बोट्रैक्स हे प्रणालीगत एचपीपीडी -प्रतिबंधक तणनाशक आहे. ते तणांमधील कॅरोटिनॉइडच्या जैवसंश्लेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण करते. परिणामी, संवेदनशील तणांमध्ये पांढुरकेपणा येऊन ते ओळखता येतात. शिफारशीनुसार वापर केल्यास मका आणि ऊस पिकांमध्ये निवडक परिणामकारकता राखण्यास हे तणनाशक मदत करते.

ह भ प अर्जुन तात्या साळुंके यांचे निधन

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी ह भ प अर्जुन तात्या साळुंके पाटील गोलटगावकर यांचे दि. १५ गुरूवार रोजी सायंकाळी निधन झाले ते ७५ होते त्यांच्यावर मागील आठ दिवसापासून वाळूज हॉस्पिटल सिडको या ठिकाणी उपचार चालू होते उपचारादरम्यान त्यांची निधन झाले. त्यांच्या पश्चात. एक मुलगा काकासाहेब साळुंखे. दोन मुली नातू परिवार होता त्यांनी गेल्या पंचवीस वर्षापासून गोलटगाव धार्मिक अध्यात्मिक सप्ताह कथा प्रवचन गोलटगाव ते पंढरपूर पायी दिंडी चालू करून अध्यात्मिक बाबतीत सतत पुढाकार घेऊन हा परिसर भक्तीमय केला यावेळी अनेक वारकरी संप्रदायातील प्रमुख पंचक्रोशीतून आलेले मोठा जनसमुदाय उपस्थितीत दि१६ शुक्रवार रोजी सकाळी ११ वा. अंतिम संस्कार करण्यात आले

कर्करोग एकाच अवयवाचा, पण प्रत्येक महिलेची कहाणी वेगळी!

छत्रपती संभाजीनगर : स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती महिन्यानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे आधुनिक उपचारपद्धती, स्तनसंवर्धन शस्त्रक्रिया आणि स्तन पुनर्निर्माणाच्या पर्यायांविषयी माहिती देण्यात आली. आज स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांमध्ये केवळ कर्करोगावर मात करणेच नव्हे, तर महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, आत्मविश्वास आणि जीवनमान जपण्यावरही भर दिला जात आहे. 'प्रत्येक महिलेची कहाणी वेगळी, प्रत्येक महिलेचा उपचारप्रवास महत्त्वाचा' या विचारातून स्तनाच्या कर्करोगाच्या उपचारांमध्ये वैयक्तिक गरजांनुसार उपचार निश्चित होत आहेत.

८वे, श्रीमती एम. एम. सैनी मॅडम कोर्ट, नि-8

जाहीर प्रसिध्दीकरण / जाहिरनामा

दिवाणी कि. अर्ज नं.359/2026

बीड येथील भे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो, यांचे न्यायालयात

१) मायावाई भागीरथ चव्हाण वय वर्षे, धंदा मजुरी, २) संदिप भागीरथ चव्हाण वय : ६१ वर्षे, धंदा घरकाम, दोघे रा. एस/ओ. १३६ ए शास्त्री नगर, दहिटणे पोट एम.आय.डी.सी. हैद्राबाद रोड, साईबाबा स्कुल, सोलापूर ३) दिपमाला शैलेंद्रसिंग ठाकुर वय : ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. १८-८-२९७/१४७, उप्पागुडा तानाजी नगर, हैद्राबाद, आंध्रप्रदेश ----- अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही - सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी बीड येथील दिवाणी न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल भगिरथसिंग बलदेवसिंग चव्हाण हे दि.१०/०३/२०२३ रोजी वर नमूद पत्त्यावर मयत झाले आहेत. कै. भगिरथसिंग बलदेवसिंग चव्हाण यांचे नावे डि व सब डि बीड पैकी तालुका धारुर पैकी मौजे धारुर येथील गट नं. ५०३/१३ यांसी एकुण क्षेत्रापैकी १.५५.०० इतकी यांसी चतुः सिमाः पुर्वेसः राजारामसिंग धरमसिंग चौव्हाण, पश्चिमेसः महिपालसिंग बलदेवसिंग चौव्हाण, दक्षिणेसः राजेंद्रसिंग कन्हैय्यासिंग चौव्हाण, उत्तरेस

प्रमिला राजपालसिंग चौव्हाण ही मिळकत आहे. त्यामुळे सदर अर्जदार नं.१ ते ३ यानी त्याचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास यानी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द आलेपासून १५ दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख १६/११/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.27 / 8/२०२६ रोजी माझ्या सहीन यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

लिपिक | कोर्टाचा शिक्का | हुकमावरून

बारामती ॲग्रो यंदा ऊस उत्पादकांना चांगला दर देणार; प्रतिटन 500 रुपये अनुदानाची मागणी

कन्नड येथील युनिट-2 च्या 2026-27 गळीत हंगामाचा शुभारंभ; पाणीटंचाईग्रस्त शेतकऱ्यांचा ऊस प्राधान्याने तोडणार

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१६ ऑक्टोबर - दुष्काळी परिस्थितीमुळे यंदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बारामती ॲग्रोच्या माध्यमातून मराठवाड्यातील इतर साखर कारखान्यांच्या तुलनेत ऊस उत्पादकांना चांगला दर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी बारामती ॲग्रो लिमिटेडचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे यांनी केली.

बारामती ॲग्रो लिमिटेड साखर कारखाना, युनिट-२, कन्नडच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाचा शुभारंभ गुळवे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पाणीटंचाईग्रस्त शेतकऱ्यांच्या उसाला प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीमुळे ज्या शेतकऱ्यांच्या उसाला पाणी कमी पडण्याची शक्यता आहे, अशा नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या उसाचे स्वतंत्र पथकाद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणानंतर संबंधित शेतकऱ्यांचा ऊस प्राधान्याने तोडून आणण्यात येईल, असे गुळवे यांनी स्पष्ट केले. पाणीटंचाईमुळे उसाचे नुकसान होण्यापूर्वी तोडणीचे नियोजन करण्यावर कारखाना भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. साखरेच्या दरात सातत्याने चढ-उतार होत असल्याने साखर कारखान्यांना ऊसदर निश्चित करताना अडचणींचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती लक्षात घेता सरकारने साखरेला प्रतिकिलो ५० रुपये हमीभाव द्यावा, अशी मागणी साखर कारखानदारांच्या वतीने करण्यात येत असल्याचे गुळवे यांनी नमूद केले. यासोबतच दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी प्रतिटन ५०० रुपये अनुदान देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

गतवर्षी ११.४५ टक्के साखर उतारा

कन्नड तालुक्यातील जमिनीची गुणवत्ता चांगली असून, येथील उसापासून चांगला साखर उतारा मिळतो. मागील गळीत हंगामात कारखान्याला ११.४५ टक्के साखर उतारा मिळाला होता. हा उतारा पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांच्या बरोबरीचा असल्याचे गुळवे यांनी सांगितले. यंदाही साखर उतारा चांगला मिळाल्यास मराठवाड्यातील इतर कारखान्यांच्या तुलनेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी कारखान्याचे व्यवस्थापक मिलिंद देशमुख, मुख्य शेतकी अधिकारी आसिफ खान पठाण, मुख्य अभियंता सुनील चौळके, उत्पादन व्यवस्थापक सहाखरी जाधव, व्यवस्थापक सतीश तेलहांडे, सतीश कुलकर्णी, रणवीर गैरवार, मिलिंद बोचरे, तुकाराम जोशी यांच्यासह गणेश बापू चव्हाण, प्रभाकरराव चव्हाण, भगवानराव चव्हाण, सोपानराव चव्हाण, सरपंच शिवत्रे, कारखान्याचे कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टाकळी येथे विभागीय आयुक्तांनी केली दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी

पिकांच्या स्थितीचा घेतला आढावा; शेतकऱ्यांना दिला दिलासा

परभणी, (प्रतिनिधी)- पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परभणी तालुक्यातील टाकळी कुं. येथे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज शेतात जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतीच्या परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच शेतकऱ्यांची सहानुभूतीपूर्वक चौकशी करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांना दिलासा दिला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीषा माथुर, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर जयस्वाल, गटविकास अधिकारी पी. एम. जाधव, तालुका कृषी अधिकारी नांदे, नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर, मंडळ अधिकारी कल्पना शेळगावकर, खाजा काजी, ग्राममहसूल अधिकारी कपिल फत्तेपूरकर यांच्यासह टाकळी कुं येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

टंचाईग्रस्त गावांत विहीर अधिग्रहण व टँकर सुरु करण्यासाठी तातडीने कार्यवाही करा!

आमदार अब्दुल सत्तार यांच्या तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना सूचना

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.15, सिल्लोड–सोयगाव तालुक्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होत असून, पाणीटंचाईमुळे नागरिकांसह शेतकरी आणि पशुधनासमोर विविध समस्या उभ्या राहत आहेत. या पार्श्वभूमीवर टंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विहीर अधिग्रहण व टँकर सुरू करण्याची प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष टँकर सुरू करावेत, अशा सूचना माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना दिल्या आहेत.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, युवा सेनेचे अक्षय मगर, प्रवीण मीरकर, रामदास साळवे, विजय खाजेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड तालुक्यातील बोरगाव कासारी, तलवाडा, निल्लोड आदी गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला व त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. यावेळी ग्रामस्थांनी गावातील पाणीटंचाईसह दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे त्यांचे लक्ष वेधले. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना करावी लागणारी धावपळ लक्षात घेता, टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम होत असून, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता आणि पशुधन जगविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. पाणीटंचाईमुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ पिण्याच्या पाण्यापुरते मर्यादित न राहता, दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याची गरज आहे.

देवगिरी बँकेचा रिक्षाचालकांसाठी अभिनव उपक्रम; विमा संरक्षणासह क्यूआर कोडचे वितरण

डस्टबिन देऊन स्वच्छतेचा संदेश; आर्थिक सक्षमीकरण आणि डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : रिक्षाचालकांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच शहराच्या स्वच्छतेला हातभार लावण्यासाठी देवगिरी नागरी सहकारी बँकेने अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. बँकेतर्फे रिक्षाचालकांसाठी आकर्षक बचत खाते योजना सुरू करण्यात आली असून, त्याअंतर्गत मोफत अपघात विमा संरक्षण, डिजिटल व्यवहारांसाठी क्यूआर कोड आणि रिक्षांमध्ये ठेवण्यासाठी छोटे डस्टबिन वितरित करण्यात आले.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून रिक्षाचालकांना आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बचत खाते आणि क्यूआर कोडमुळे प्रवाशांकडून भाडे स्वीकारणे सोयीचे होणार असून, डिजिटल व्यवहारांना चालना मिळेल. तसेच नियमित बचतीची सवय लागण्यास मदत होईल. मोफत अपघात विम्यामुळे रिक्षाचालकांना आर्थिक सुरक्षिततेचा आधार मिळणार आहे.

रिक्षांमध्ये डस्टबिन ठेवून प्रवाशांनी कचरा रस्त्यावर न टाकता त्याचा योग्य वापर करावा. रिक्षाचालकांनीही प्रवाशांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन किशोर शितोळे यांनी केले. या उपक्रमामुळे रिक्षाचालकांना आर्थिक सुविधांसोबतच स्वच्छतादूत म्हणून नवी ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य विशाल दरगड उपस्थित होते. कार्यक्रमाला बँकेचे संचालक नागनाथ काजळे, सुरेश जगाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, जाणता राजा रिक्षाचालक संघटनेचे अध्यक्ष किशोर माळी यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षाचालक उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल रिक्षाचालकांनी बँकेचे आभार मानले.

शालेय हॉकी स्पर्धेला प्रारंभ; स्वराज्य अकॅडमी खुलताबादची विजयी सलामी

डॉ. केजल भारसाखळे यांच्या हस्ते उद्घाटन; 14, 17 व 19 वर्षांखालील गटांसाठी जिल्हास्तरीय लीग स्पर्धा सुरु करणार

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : विभागीय क्रीडा संकुलात शालेय हॉकी स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. केजल भारसाखळे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात स्वराज्य अकॅडमी, खुलताबादच्या संघाने डिफेन्स करिअर अकॅडमी, गंगापूरचा ३-० गोलने पराभव करत विजयी सलामी दिली.

उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी के. व्ही. यादवराव, शामसुंदर भालेराव, शेख समीर आणि मोहम्मद वसीम अकबर खान आदी उपस्थित होते. हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल डॉ. भारसाखळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यातील उदयोन्मुख हॉकीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना अधिकाधिक स्पर्धात्मक संधी उपलब्ध करून देण्यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचे डॉ. भारसाखळे यांनी सांगितले. तसेच १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांसाठी लवकरच जिल्हास्तरीय लीग स्पर्धा सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी त्यांनी खेळाडूंशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटातील पहिल्या सामन्यात स्वराज्य अकॅडमी, खुलताबादने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. अमन संजय देशमुख याने सामन्याच्या पहिल्याच मिनिटाला गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर कुणाल गजानन घोशीर आणि गौरव जगदीश नागे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. त्यामुळे स्वराज्य अकॅडमीने ३-० असा विजय मिळवला.

कोहिनूर महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन निमित्त ग्रंथ प्रदर्शन आणि एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न महान शास्त्रज्ञ डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य प्रो. डॉ.कमरुनीसाबेगम यांच्या हस्ते करण्यात आले व दिनांक १६ /१०/ २०२६ रोजी ग्रंथालय विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेचा विषय "कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता त्याचा मौलिक वापर आणि स्मार्ट संशोधन डेटाबेस एकत्रीकरण" या विषयावर विवेकानंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रो.डॉ. गोवर्धन औटी हे प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून उपस्थित होते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना त्यांनी आपल्या मनोगतात एआय साक्षरता म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान कसे काम करते हे समजून घेणे त्याचे मूल्यमापन करणे आणि त्याचा दैनंदिन जीवनात प्रभाविपणे वापर करण्याची क्षमता होय

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य प्रो. डॉ.कमरूनींसा बेगम होत्या तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफिल्लाह खान व डॉ. जिते सुभाष व ग्रंथपाल प्रो. डॉ. सारिका रेणुगुंटवार उपस्थित होत्या कार्यक्रमाचे पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल डॉ. सारिका रेनगुंठवार यांनी करून दिला यावेळी शेख मुस्कान व शेख रेहान या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या दोन्ही विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रोत्साहन पर पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले अध्यक्ष समारोपात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफिउल्लाह खान यांनी केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत तेरकर यांनी केले तर आभार डॉ.शेख मोहम्मद अरिफ यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

गंगापूरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवानिमित्त भव्य पथसंचलन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१६: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विजयादशमी उत्सवानिमित्त गंगापूर शहरातून दि.१८ (रविवारी) भव्य पथसंचलन आयोजित करण्यात आले आहे शहरातील धुत कन्या प्रशालेच्या प्रांगणातून सकाळी ८:३० वाजता प्रारंभ होणार असून शहरातील धूत कन्या शाळा, दक्षिणमुखी मारुती मंदिर,स्वामी समर्थ केंद्र,गणपती मंदिर ,संत सेना महाराज चौक,मारुती चौक, जिजामाता चौक, शिवाजी महाराज चौक, पेशवे नगर या मार्गाने येऊन पेशवे नगरातील काळाराम मंदिर येथे संचालनाचा समारोप होणार आहे पथसंचलनास सर्व स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात वेळेवर उपस्थित राहावे असे आयोजक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गंगापूर तालुका यांनी केले आहे.

ढोरेगावच्या जिल्हा परिषद शाळेत 'IDEL सेंटर'चे लोकार्पण

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१६: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि तंत्रज्ञानाधारित अध्ययनाच्या समान संधी मिळाव्यात, या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगाव येथे शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी 'IDEL सेंटर'चा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला.

डिजिटल स्क्रीनयुक्त स्वतंत्र कार्यस्थळे, विद्यार्थ्यांसाठी आसनव्यवस्था आणि मोठ्या डिस्प्ले स्क्रीनसारख्या सुविधांनी सज्ज असलेल्या या अध्ययन केंद्रामुळे शाळेच्या शैक्षणिक वाटचालीत नवा अध्याय सुरू झाला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या ज्ञान, सर्जनशीलता आणि कौशल्यविकासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारा हा उपक्रम गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे.

या लोकार्पण सोहळ्यास गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे,अयुब पटेल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलिल पटेल, उपसरपंच पुंजाराम पठाडे, उपाध्यक्ष अशोक कांबळे,उदय सुलाखे,केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापक राजेश हिवाळे, अशोक शेवाळे,गणेश माळी,पांडू पठाडे, संपत शिंदे, सतीश कबाडे, शिवाजी मोरे, संजय वल्ले, विजय इंगळे, वैशाली चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांच्या 'यूरिन लीकेज'च्या समस्येवर फ्रेंड्सची नवी मोहीम

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : मध्यमवयीन महिलांमध्ये लघवीवरील नियंत्रण सुटण्याच्या समस्येबाबत जनजागृती करण्यासाठी नोबेल हायजीन लिमिटेडच्या 'फ्रेंड्स ॲडल्ट ड्राय पँट्स' या ब्रँडने नवीन दूरचित्रवाणी जाहिरात मोहीम सुरू केली आहे. ॲडल्ट डायपर वापरण्याबाबत महिलांच्या मनात असलेला संकोच दूर करून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

कंपनीच्या माहितीनुसार, भारतात ४५ वर्षांवरील दर तीन महिलांपैकी एका महिलेला लघवी गळतीच्या समस्येचा सामना करावा लागतो. मात्र, सामाजिक संकोच आणि गैरसमजांमुळे अनेक महिला या समस्येवर उपाय शोधण्याऐवजी बाहेर जाणे, प्रवास करणे, कपड्यांची निवड आणि सामाजिक कार्यक्रमांमधील सहभाग यावर मर्यादा घालतात.

ॲडल्ट डायपर हे केवळ वृद्ध किंवा अंथरुणाला खिळलेल्या व्यक्तींसाठी असतात, अशी धारणा असल्याने मध्यमवयीन महिलांना त्यांचा वापर करताना संकोच वाटतो. ही मानसिकता बदलण्यावर मोहिमेत भर देण्यात आला आहे.

नोबेल हायजीन लिमिटेडचे मुख्य विपणन व विकास अधिकारी कार्तिक कमल जोहरी यांनी सांगितले की, लघवी गळतीचा महिलांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होतो. ॲडल्ट डायपरचा व्यावहारिक पर्याय म्हणून स्वीकार वाढवून महिलांना सक्रिय जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

साइडवेजचे संस्थापक अभिजित अवस्थी यांनी मैत्री, विश्वास आणि सुरक्षिततेच्या भावनांतून हा संवेदनशील विषय मांडल्याचे सांगितले. प्रवासासह दैनंदिन जीवनात महिलांचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा जपण्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे.

अग्रलेख

दुष्काळाशी दोन हात!

केवळ मराठवाड्याच्याच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या पुढच्या पिढीच्या आयुष्यातून दुष्काळाचा अनुभव कायमचा पुसला जावा यासाठी मोहीम हाती घेण्याच्या राज्य सरकारच्या प्रतिज्ञेला यंदा लगेचच दुष्काळाच्या भीषण संकटाने दिलेले आव्हान पेलण्यासाठी आणि या संकटाचा सामूहिक सामना करण्यासाठी सुरू झालेल्या संघर्षाची आता नवी कसोटी सुरू झाली आहे. ही कसोटी केवळ सरकारची, म्हणजे शासनाची नाही, तर ती प्रशासनाचीही आहे, राजकारणाचीही आहे आणि जनतेचीदेखील आहे. या संकटांचा सामना सामूहिकपणानेच करावा लागतो. त्यामुळेच, दुष्काळाशी दोन हात करताना सरकारला प्रशासकीय यंत्रणांची प्रामाणिक साथ मिळावी अशी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेली अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी राज्यातील प्रशासन यंत्रणेने स्वीकारायला हवी. अडचणीच्या आणि संकटाच्या काळात प्रशासकीय यंत्रणा जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, असा विश्वास दोन-चार दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखविला होता. ग्रामीण भागाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधायचा असेल तर लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावयास हवे असे आवाहन करताना, अशा कामासाठी शासन कोणत्याही प्रकारच्या सहकार्यात हात आखडता घेणार नाही अशी ग्वाहीदेखील त्यांनी तेव्हा दिली होती. यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीला अतिवृष्टीने हाहाकार उडाला आणि नंतर मात्र पावसाने पुरती दडी मारली. त्यामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने राज्यातील ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळाच्या संकटास शक्तिनिशी सामोरे जाण्याची प्रचंड इच्छाशक्ती फडणवीस सरकारकडे आहे, हे बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळ निवारणासाठी आखलेल्या विविध योजना आणि घोषणांवरून स्पष्ट झाले आहे. दुष्काळाचे सर्वाधिक चटके शेतीला आणि पर्यायाने शेतकऱ्यांस सोसावे लागतात. शेतकऱ्यासोबत पाळीव जनावरांनादेखील दुष्काळात जगण्याचा संघर्ष करावा लागतो, पण अशा संघर्षात त्यांना माणसाचीच साथ असावी लागते. फडणवीस यांच्या सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या काही निर्णयांनुसार, शेतकऱ्याच्या जनावरांना जगविण्याच्या काही ठोस उपाययोजनाही आखण्यात आल्या आहेत.

कोणतेही संकट जोवर थेट उंबरठ्याशी येऊन उभे ठाकत नाही, तोवर त्याची फारशी फिकीर केली जात नाही, हा सार्वत्रिक सामाजिक स्वभाव असतो. गावागावांतील तलावांचा गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे, जलसंधारणाच्या योजना राबविणे आणि जलतारा संरचना उभारून पाणी जिरविण्याचे उपाय सुरू करावेत, अशी सरकारची जनतेकडून अपेक्षा आहे. मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाच्या प्रामाणिकपणावर विश्वास व्यक्त केला त्याला दोन-तीन दिवस उलटण्याआधीच प्रशासनाच्या चुकारपणावर नाराजी व्यक्त करण्याची वेळ त्यांच्यावर यावी, ही प्रामाणिकपणाच्या अपेक्षेसोबत होणारी प्रतारणा म्हणावी लागेल. दुष्काळी परिस्थितीत कोणताही नागरिक उपाशी राहणार नाही याची काळजी घेण्याची हमी देताना मुख्यमंत्र्यांचा प्रशासनाच्या प्रामाणिकपणावर विश्वास असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर दोन-चार दिवसांतच, एका बाजूला सरकारच्या स्तरावर दुष्काळावर मात करण्यासाठी झटून निर्णय घेताना प्रशासनाच्या झारीतील शुक्राचार्यांचे काही नमुनेही त्यांना अनुभवास आले असावेत. अन्यथा, दोन दिवसांपूर्वी विश्वासाची फुले उधळणाऱ्या मुख्यमंत्र्यांवर आज प्रशासनास कानपिचक्या देण्याची वेळ आली नसती. शिक्षक, पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्याचे कारण देत दुष्काळ निवारणाच्या कामासाठी मंत्र्यांनी आयोजित केलेल्या बैठकांकडे पाठ फिरविणाऱ्या अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या त्या विश्वासाला पाने पुसण्याचे काम केले असेल, तर त्याची गांभीर्याने दखल घ्यावयास हवी. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांना थेट घरचा रस्ता दाखविण्याचा कठोर इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

यंदाचा दुष्काळ गेल्या सुमारे सहा दशकांतील सर्वांत भीषण असेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. १९७२ मधील दुष्काळाने महाराष्ट्राला दिलेल्या चटक्यांच्या अनुभवाने होरपळलेली असंख्य मने या नव्या भीतीमुळे अधिकच थरकापली आहेत. दुष्काळाच्या प्रसंगी स्वार्थदेखील उफाळून येतो, असे म्हणतात. म्हणजेच, दुष्काळ हे संकट असले तरी त्यालादेखील पर्वणी समजून त्याचे गैरफायदे घेणाऱ्या प्रवृत्ती या काळात पुढे सरसावतात. साठेबाजी, महागाई, दुष्काळ निवारण योजनांच्या अंमलबजावणीत भ्रष्टाचार, जनावरांच्या छावण्याच नव्हे, तर चारा आणि शेणामध्येही भ्रष्टाचाराची कीड फोफावते असे दाखले याआधी देशाने अनुभवले आहेत. शेतकरी, जनावरे, सामान्य जनता आणि उद्योगधंद्यांना दुष्काळाच्या झळांची तीव्रता कमी व्हावी यासाठी सरकारने घेतलेले निर्णय स्वागतार्ह आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीआधी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जमा करण्याचा निर्णय घेऊन सरकारने संवेदनशीलता दाखविली आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क सरसकटपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आहे आणि मुख्य म्हणजे कर्जाच्या वसुलीसाठी तगादा लावणाऱ्यांना सक्त तंबी देऊन सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा कृतिशील निर्धार दाखविला आहे. केंद्राच्या पीकविमा योजनेचा लाभदेखील महाराष्ट्रास मिळणार आहे. कृषी पंपांची वीजबिल सवलत देण्याकरिता अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यात आली आहे, तर पंतप्रधान किसान सन्मान योजनेत तितकीच भर घालणाऱ्या राज्य सरकारच्या योजनेमुळे शेतकऱ्याच्या समस्यांचे ओझे काही प्रमाणात तरी हलके करण्याचा राज्य सरकारचा संकल्प सिद्ध झाला आहे. गेल्या काही दशकांत हवामान बदल, अल निनोसारख्या समस्या आदींमुळे नैसर्गिक आपत्तींनी जगाच्या अनेक भागांत जगण्याचा संघर्ष तीव्र केला आहे. वातावरणातील बदलाचे याहूनही अधिक तीव्र चटके येत्या पाच दशकांत मानवजातीला सोसावे लागतील असे इशारे आता प्रत्यक्षात अनुभवास येऊ लागले आहेत. अशा संकटांमुळे येत्या काही दशकांत अन्नधान्याचा तुटवडा, पाणीटंचाई, आरोग्याच्या समस्या, वाढता मृत्युदर, उष्णतेच्या लाटा, थंडीचा कडाका, अतिवृष्टी, अवर्षण, महापूर, वादळे अशी अनेक संकटे अनपेक्षितपणे आदळणार आहेत. त्यांना सामोरे जायचे असेल, तर स्वार्थ बाजूला ठेवावा लागेलच, पण अशा आपत्तींचा सामना करताना संकटात सापडणाऱ्या प्रत्येक हाताने एकमेकांसोबत राहूनच सामोरे जाण्याची गरज आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या उपाययोजनांमुळे दुष्काळ नाहीसा होईलच असे नाही, पण दुष्काळाचे चटके सौम्य होण्याकरिता त्यांची निश्चितच मदत होणार आहे. अशा वेळी, दुष्काळाची ढाल करून राजकारण करण्याचे प्रयत्न काही काळ बाजूस सारावयास हवेत. किंबहुना, निव्वळ राजकारणासाठी आणि राजकीय स्वार्थासाठी नवनव्या समस्यांची काल्पनिक भुतावळ उभी करून जनतेत संभ्रम माजवत रस्त्यावर उतरून समस्यांमध्ये भर घालणाऱ्या राजकारणातून सरकारशी संघर्ष करण्याऐवजी, सरकारसोबत हातात हात घालून या समस्येचा सामूहिक सामना करणे अधिक गरजेचे ठरणार आहे. कारण ही वेळ एकमेकांशी संघर्ष करण्याची नसून, एकमेकांच्या सहकार्याने संकटाशी संघर्ष करण्याची आहे. संकटकाळात समाज सामूहिकपणे संघर्षासाठी सिद्ध होतो. राजकारणाने तो समंजसपणा दाखविला आणि प्रशासनाने प्रामाणिकपणा जपला, तर संकट पेलण्याची महाराष्ट्राची शक्ती निश्चितच दुणावेल यात शंका नाही. ■

अर्थविशेष

मुलांना घर, मालमत्ता देताना कराचे नियम

ॲड. हितेश पारसे

निवृत्तीनंतरच्या आयुष्यात स्वतःच्या मालकीचे घर, प्लॉट किंवा इतर स्थावर मालमत्ता ही केवळ संपत्ती नसते, तर ती आर्थिक सुरक्षिततेचा मोठा आधार असते. अनेक ज्येष्ठ नागरिक आपल्या हयातीतच मुलांच्या नावावर घर किंवा मालमत्ता करून देण्याचा विचार करतात. काही जण मुलांमधील मालमत्तेचे वाटप करण्यासाठी, काही जण भविष्यातील वाद टाळण्यासाठी, तर काही जण आपल्या मुलांना आर्थिकदृष्ट्या स्थिर करण्यासाठी हा निर्णय घेतात. मात्र, मालमत्ता मुलांच्या नावावर करताना केवळ नोंदणी कार्यालयातील प्रक्रिया पूर्ण करणे पुरेसे नसते. आयकराचे नियम, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, भविष्यातील भांडवली नफा, मालमत्तेवरील उत्पन्न आणि स्वतःच्या राहण्याच्या व आर्थिक सुरक्षिततेच्या गरजा या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक असते.

१. मुलांना मालमत्ता भेट दिल्यास आयकर भरावा लागतो का? : आई-वडिलांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला घर, जमीन किंवा अन्य स्थावर मालमत्ता विनामोबदला भेट म्हणून दिल्यास, सामान्यतः ती भेट प्राप्त करणाऱ्या मुलाच्या किंवा मुलीच्या हातात करपात्र ठरत नाही. आयकर कायद्यातील नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींसाठी असलेल्या सवलतीमुळे ही तरतूद लागू होते. मुलगा किंवा मुलगी हा या उद्देशासाठी पात्र नातेवाईक आहे. उदाहरणार्थ, एखाद्या ज्येष्ठ नागरिकाच्या घराचे मुद्रांक मूल्य ७५ लाख रुपये आहे. त्यांनी कोणताही मोबदला न घेता नोंदणीकृत गिफ्ट डीडद्वारे हे घर आपल्या मुलीला भेट दिले, तर केवळ या भेटीमुळे मुलीला ७५ लाख रुपयांच्या मूल्यावर उत्पन्नकर भरावा लागत नाही.

२. गिफ्ट डीड करावी की मृत्युपत्र करावे? : मालमत्ता मुलांच्या नावावर करण्यासाठी प्रामुख्याने दोन पर्याय विचारात घेतले जातात- गिफ्ट डीड आणि मृत्युपत्र. गिफ्ट डीड म्हणजे मालमत्ता हयातीतच भेट म्हणून हस्तांतरित करणे. स्थावर मालमत्तेच्या भेटीसाठी कायद्यानुसार नोंदणीकृत दस्तऐवज आवश्यक असतो. देणाऱ्याची स्वाक्षरी, किमान दोन साक्षीदारांचे साक्षांकन आणि भेट स्वीकारणाऱ्याची स्वीकृती यांना महत्त्व आहे. दुसरीकडे, मृत्युपत्राद्वारे मालमत्तेचे वाटप केल्यास मालमत्ता साधारणतः मृत्यूनंतर लाभार्थीला मिळते. मृत्युपत्र कायदेशीर अटींच्या अधीन राहून बदलता किंवा रद्द करता येते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या हयातीत मालमत्तेवरील नियंत्रण कायम ठेवायचे असल्यास मृत्युपत्र हा विचार करण्याजोगा पर्याय ठरू शकतो.

३. महाराष्ट्रात गिफ्ट डीडवरील मुद्रांक शुल्क किती? : मालमत्ता हस्तांतरण करताना मुद्रांक शुल्काचा विचार अत्यंत महत्त्वाचा असतो. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद ३४ नुसार, काही विशिष्ट कौटुंबिक भेटींना विशेष सवलत उपलब्ध आहे. महाराष्ट्रात निवासी किंवा कृषी मालमत्ता पती किंवा पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात किंवा मृत मुलाच्या पत्नीला भेट म्हणून दिल्यास, संबंधित कायदेशीर अटींच्या अधीन राहून गिफ्ट डीडवरील मुद्रांक शुल्क २०० रुपये असू शकते. मात्र, या सवलतीचा अर्थ प्रत्येक प्रकारच्या मालमत्ता हस्तांतरणासाठी केवळ २०० रुपयेच शुल्क लागेल, असा नाही.

४. गिफ्ट डीड केल्यावर पालकांना भांडवली नफा कर लागतो का? : मालमत्ता भेट म्हणून हस्तांतरित करताना ज्येष्ठ नागरिकांना एक महत्त्वाची करसवलत उपलब्ध असते. पात्र भेट व्यवहाराला आयकर कायद्यानुसार भांडवली मालमत्तेचे करपात्र हस्तांतरण मानले जात नसल्यामुळे, केवळ अशा भेटीमुळे सामान्यतः देणाऱ्या पालकांना भांडवली नफा कर लागत नाही.

५. मुलांना मालमत्ता दिल्यानंतर मिळणाऱ्या भाड्यावरील कर कोण भरेल? : समजा, ज्येष्ठ नागरिकांनी आपले भाड्याने दिलेले घर मुलाच्या नावावर गिफ्ट डीडद्वारे हस्तांतरित केले. अशा परिस्थितीत हस्तांतरण वैधरीत्या पूर्ण झाल्यानंतर आणि संबंधित उत्पन्नाचे मालकी हक्कानुसार निर्धारण झाल्यावर, सामान्यतः त्या घरातून मिळणारे भाडे मुलाच्या उत्पन्नात समाविष्ट होऊ शकते.

६. मुलांना मालमत्ता देताना स्वतःची सुरक्षितता कशी जपावी? : ज्येष्ठ नागरिकांसाठी हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. मालमत्ता मुलांच्या नावावर केल्यानंतर पालकांना स्वतःच्या घरात राहण्याचा, देखभालीचा खर्च भागवण्याचा किंवा वैद्यकीय खर्चासाठी पैसे मिळण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. माता-पिता व ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण अधिनियम, २००७ अंतर्गत, विशिष्ट परिस्थितीत ज्येष्ठ नागरिकांनी देखभालीच्या अटीवर केलेले मालमत्ता हस्तांतरण रद्द करण्यासाठी कायदेशीर उपाय उपलब्ध होऊ शकतो. मात्र, अशा उपायासाठी कायद्यातील आवश्यक अटी पूर्ण झालेल्या असणे गरजेचे आहे.

७. सर्व मुलांना समान मालमत्ता द्यायची असल्यास काय करावे? : अनेक कुटुंबांमध्ये एकापेक्षा अधिक मुले असतात. काही पालक एकाच मुलाला घर देतात, तर इतर मुलांना पैसे किंवा दुसरी मालमत्ता देतात. अशा वेळी भविष्यात गैरसमज किंवा वाद टाळण्यासाठी मालमत्तेचे मूल्यांकन, प्रत्येकाला दिलेला हिस्सा आणि संबंधित अटी लेखी स्वरूपात स्पष्ट करणे योग्य ठरते.

८. मालमत्ता हस्तांतरणापूर्वी कोणती कागदपत्रे तपासावीत? : मालमत्तेची मूळ खरेदीखत किंवा मालकी हक्काची कागदपत्रे, सात-बारा उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड, लागू असल्यास सोसायटीचे शेअर सर्टिफिकेट, मालमत्तेवरील कर्जाची माहिती, आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे आणि संबंधित परवानग्या तपासाव्यात. मालमत्ता संयुक्त मालकीची असल्यास इतर सहमालकांचे हक्कही लक्षात घ्यावेत. गिफ्ट डीडमध्ये मालमत्तेचे अचूक वर्णन, देणारा आणि घेणारा यांचे तपशील, भेटीचे स्वरूप, स्वीकाराची नोंद आणि आवश्यक अटी स्पष्ट असाव्यात. दस्तऐवजाची नोंदणी झाल्यानंतर लागू प्रक्रियेनुसार मालमत्ता नोंदी, सोसायटीचे अभिलेख आणि इतर संबंधित नोंदी अद्ययावत कराव्यात. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

दृष्टिक्षेप

कॉर्पोरेट अरेरावी आणि सुरक्षेचे आव्हान

कैलास ठोळे

एकविसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञान मानवी जीवनाला अभूतपूर्व गती आणि सुलभता देत असले, तरी या प्रगतीच्या नाण्याला एक अत्यंत चिंताजनक आणि काळी बाजूही आहे. गेल्या काही दशकांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील मोजक्या महाकाय कंपन्यांनी (ज्यांना 'बिग टेक' म्हणून ओळखले जाते) जगभरातील बाजारपेठांवर अशी काही पकड मिळवली आहे, की त्यांचे भांडवल अनेक लहान आणि मध्यम देशांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही (जीडीपी) मोठे झाले आहे. या अफाट आर्थिक आणि तांत्रिक सामर्थ्यातून निर्माण झालेला अहंकार इतका विकृत स्वरूप धारण करू लागला आहे, की या कंपन्या आता स्वतःला कोणत्याही देशाच्या कायद्यापेक्षा, संविधानापेक्षा आणि राष्ट्रीय हितांपेक्षा श्रेष्ठ समजू लागल्या आहेत. त्यांचे व्यापारी हितसंबंध पूर्ण होत नाहीत किंवा त्यांच्या मर्जीनुसार नियम वाकवले जात नाहीत, त्या देशाच्या थेट राष्ट्रीय नेतृत्वाची प्रतिमा मलिन करण्याच्या, सार्वजनिक मतप्रवाह दूषित करण्याच्या आणि प्रसंगी राजकीय व्यवस्था अस्थिर करण्याच्या कुटिल डावांना हवा देतात. लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि अगदी काही आशियाई देशांमध्येही लोकशाही सरकारांना दबावाखाली आणण्याचे आणि आपल्या नफ्यासाठी राजकीय घडामोडींवर प्रभाव पाडण्याचे खेळ यापूर्वीही खेळले गेले आहेत. एलन मस्क यांनी भारतासंदर्भात अलिकडेच केलेले वक्तव्य याच जुन्या आणि धोकादायक साम्राज्यवादी प्रवृत्तीची आधुनिक डिजिटल आवृत्ती आहे.

एलन मस्क यांनी आपल्या 'एक्स' खात्यावरून भारतावर थेट निशाणा साधताना असा सूर लावला, की त्यांच्या 'स्टारलिंक' या उपग्रह इंटरनेट कंपनीला जगातील १६५ हून अधिक देशांमध्ये परवाने मिळालेले असताना, भारताच्या सर्व नियमांचे पाच वर्षे पालन करूनही अंतिम मंजुरी का मिळत नाही? पुढे जाऊन त्यांनी थेट मुकेश अंबानींचे नाव घेत, 'भारताचे खरे बॉस अंबानीच आहेत का?' असा खोचक आणि अपमानकारक सवाल विचारला. वरवर पाहता हा प्रश्न एखाद्या वैतागलेल्या गुंतवणूकदाराचा वाटू शकतो; परंतु या विधानामागचे राजकारण, त्याची वेळ आणि त्यातील अर्धसत्य अत्यंत धूर्तपणे रचले आहे. मस्क यांनी निर्माण केलेला हा आभास वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आहे. भारतीय प्रशासनाने आधीच स्पष्ट केले आहे, की 'स्टारलिंक'ला मे २०२५ मध्येच 'सॅटेलाईट ब्रॉडबॅण्ड' सेवेसाठीचा तत्त्वतः परवाना देण्यात आला आहे. प्रश्न केवळ 'स्पेक्ट्रम' वाटपाचा आणि त्याच्याशी संबंधित अंतिम परवानग्यांचा आहे. भारत हा जगातील सर्वांत मोठा आणि संवेदनशील डेटा बाजारपेठ असलेला देश आहे. उपग्रह आधारित दळणवळण हे केवळ इंटरनेट पुरवण्याचे साधन नसून देशाच्या हवाई सीमा, सागरी सीमा आणि अंतराळ सुरक्षेशी जोडलेले संवेदनशील तंत्रज्ञान आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणुकीचे निकष, डेटाची स्थानिक पातळीवरील साठवणूक आणि गुप्तचर यंत्रणांच्या सुरक्षा अटींची पूर्तता झाल्याशिवाय 'स्पेक्ट्रम' वाटप करणे कोणत्याही जबाबदार सरकारला परवडणारे नाही. मस्क यांच्या विधानाचा दुसरा विरोधाभास म्हणजे त्यांनी मुकेश अंबानी यांच्यावर केलेला व्यक्तिगत हल्ला. मस्क यांच्या 'स्टारलिंक'ने भारतात आपली ग्राऊंड स्टेशन्स आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी 'रिलायन्स जिओ' आणि 'भारती एअरटेल' या दोन्ही आघाडीच्या भारतीय दूरसंचार कंपन्यांशी भागीदारी केलेली आहे. 'रिलायन्स जिओ'चे प्रमुख अंबानी आहेत. ज्यांच्याशी व्यावसायिक करार करून भारतात पाय रोवण्याची योजना आखली जाते, त्यांच्यावरच अशा प्रकारे सार्वजनिक व्यासपीठावर चिखलफेक का केली जावी? यामागे मस्क यांची दुहेरी खेळी स्पष्टपणे दिसून येते. पहिली गोष्ट म्हणजे, मस्क यांना भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा अटींमध्ये आणि डेटा सुरक्षेच्या कठोर नियमांमध्ये स्वतःसाठी सवलती हव्या आहेत. दुसरी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, उपग्रह इंटरनेट आणि भविष्यातील सॅटेलाईट कम्युनिकेशन क्षेत्रात कोणतीही भारतीय कंपनी मग ती जिओ असो किंवा एअरटेल; आपल्या तोडीस तोड स्पर्धक म्हणून उभी राहू नये, याची त्यांना भीती वाटत आहे. मस्क यांना भारतात केवळ एक विक्रेता म्हणून नव्हे, तर या मोक्याच्या क्षेत्रावर एकछत्री अंमल गाजवणारा सम्राट म्हणून उतरायचे आहे.

सध्या केंद्र सरकार देशांतर्गत पातळीवर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय मुद्द्यांवरून विरोधकांच्या निशाण्यावर असताना मस्क यांनी हे वक्तव्य केले. भारतीय लोकशाहीतील अंतर्गत राजकीय संघर्षाचा फायदा घेऊन सरकारवर बाह्य दबाव आणण्याची ही अत्यंत हुशार चाल होती. दुर्दैवाने, भारताच्या अंतर्गत राजकारणातील मुत्सद्देगिरी इथे तोकडी पडताना दिसली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मस्क यांच्या या विधानावर अत्यंत घाईघाईने आणि परिणामांचा विचार न करता प्रतिक्रिया दिली. 'भारतात तुमचे स्वागत आहे एलन, जोपर्यंत दुसरा माणूस (अंबानी) बदलत नाही, तोपर्यंत वाट पाहा,' अशा आशयाचे भाष्य करत त्यांनी या वादात उडी घेतली. घरगुती राजकारणात सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी अशा शेरेबाजीचा वापर तात्कालिक फायदा देऊ शकतो; पण राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या पातळीवर अशी प्रतिक्रिया देशाच्या हिताला मारक ठरते. विशेष म्हणजे, 'स्टारलिंक'ने सुरुवातीला 'जिओ' आणि 'एअरटेल'शी हातमिळवणीची चर्चा सुरू केली होती, तेव्हा याच काँग्रेस पक्षाने भारताच्या डेटा सुरक्षेवर आणि उपग्रह संवादातील परकीय हस्तक्षेपावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. मग आज अचानक मस्क यांच्या पाठीशी उभे राहून स्वतःच्याच देशाच्या सुरक्षा यंत्रणांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह का उभे केले जात आहे?

देशांतर्गत पातळीवर अंबानी किंवा अदानी यांच्या उद्योगसमूहांचे कथित एकाधिकार किंवा त्यांना मिळणारे कथित अनुकूल वातावरण हा अंतर्गत चर्चेचा, संसदेतील वादाचा आणि जनमताच्या परीक्षेचा विषय असू शकतो; परंतु एका परकीय तंत्रज्ञान राक्षसाला खूश करण्यासाठी आपण आपल्याच देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी घातलेल्या अटी शिथिल करायच्या का? निव्वळ विदेशी कंपनीचे मालक मस्क आहेत, म्हणून त्यांना विनाअट रान मोकळे करून द्यायचे आणि भारतीय कंपन्यांवर संशय घ्यायचा, ही कोणती राष्ट्रनीती आहे? उलटपक्षी, जागतिक पटलावर भारताचे धोरण नेहमीच स्वदेशी क्षमतांना बळ देणारे असायला हवे. कोणत्याही मोक्याच्या क्षेत्रात विदेशी कंपन्यांवरचे शत-प्रतिशत अवलंबित्व हे भविष्यातील गुलामगिरीची नांदी ठरते.

बेभरवशाच्या, लहरी आणि स्वतःच्या नफ्यालाच सर्वोच्च मानणाऱ्या उद्योगपतीच्या हातात भारताच्या सुरक्षेच्या नाड्या सोपवता येणार नाहीत. त्यामुळेच, भारतीय कंपन्या या क्षेत्रात सक्षम होत असतील, तर राष्ट्रीय हित म्हणून त्यांना प्राधान्य मिळणे ही काळाची गरज आहे. घरगुती राजकारणात त्यावरून कितीही धुरळा उडाला तरी मस्क यांच्याकडे दुर्लक्ष करावे लागेल. ■

(लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

मातृरूपेण संस्थिता

सहावी माळ

या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥

देवीच्या उपासनेचा हा सिद्ध मंत्र मार्कंडेय पुराणातील देवीमाहात्म्य अर्थात सप्तशतीच्या पाठात आढळतो. अनाचार आणि दुराचार वाढून समाजजीवन उद्ध्वस्त होत असताना आदिशक्ती विविध रूपांत, विविध अवतारांत प्रकट झाली आणि तिने आपल्या भक्तांना मानसिक, शारीरिक, बौद्धिक तसेच आर्थिक पाठबळ दिले. मानवी जडणघडणीत देवीचे स्थान अतिशय अगम्य, व्यापक आणि महत्त्वपूर्ण आहे.

मानव जन्माला आला की त्याच्या भाळी ललाटरेषा लिहिणारी सटवाई, रोगराई अंगावर घेऊन बालकांच्या आरोग्याची आबाळ होऊ न देणारी पोचीमाई, जलदेवता म्हणून प्रसिद्ध असलेली आसरा देवी, गावाचे संरक्षण करणारी मसाई-मरीआई, विद्येची देवता माता सरस्वती अशा विविध रूपांत देवी मानवी जीवनात प्रकट होत आली आहे. त्यामुळे देवी ही मानवी जीवनातील अत्यंत मोलाची, महत्त्वाची आणि जीवनदायी शक्ती ठरली आहे.

म्हणूनच केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतभर देवीपूजा अथवा शक्तिपूजा समाजातील विविध जाती-जमाती आणि संप्रदायांमध्ये श्रद्धेने केली जाते. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली अनेक जागृत देवस्थाने आणि शक्तिपीठे आहेत. विदर्भातील चंद्रपूरची कालिका माता, अंबाजोगाईची योगेश्वरी माता, मुंबईतील जोगेश्वरी माता, गोव्यातील माता मंगेशी, आंध्र प्रदेशातील बासर येथील माता सरस्वती अशी अनेक जागृत शक्तिस्थाने भक्तांच्या श्रद्धेची आणि उपासनेची केंद्रे बनली आहेत.

भारतामध्ये प्रमुखतः तीन धार्मिक संप्रदाय मानले जातात- शैव, वैष्णव आणि शाक्त. यापैकी शैवपंथीय हे भगवान शिवाचे उपासक, वैष्णवपंथीय भगवान विष्णू किंवा पांडुरंगाचे भक्त, तर शाक्तपंथीय हे आदिशक्ती अर्थात देवीचे उपासक मानले जातात. स्वामी विवेकानंदांचे गुरू परमपूज्य रामकृष्ण परमहंस हे शाक्त संप्रदायाचे महान उपासक होते. ते माता कालिकेचे परमभक्त होते. महाकाली ही संहार, काल आणि शक्तीची देवता मानली जाते. देवी पार्वतीचे हे अत्यंत उग्र आणि प्रचंड शक्तिस्वरूप मानले जाते. त्रिभुवनाला त्रस्त करणाऱ्या रक्तबीज नावाच्या भयंकर दैत्याचा वध करण्यासाठी मातेने हे रूप धारण केले, अशी पुराणकथा आहे. रक्तबीजाच्या शरीरातील रक्ताचा एक थेंब जमिनीवर पडला की त्यातून पुन्हा एक नवीन रक्तबीज निर्माण होत असे. त्यामुळे त्याचा संहार करणे अत्यंत कठीण झाले होते. रक्तबीजाचा रक्ताचा एकही थेंब जमिनीवर पडू नये, यासाठी माता महाकालीने आपली अक्राळविक्राळ जीभ बाहेर काढून त्याचे सर्व रक्त प्राशन केले आणि त्याचा संपूर्ण संहार केला. अशा प्रकारे मातेने त्रिभुवनाला रक्तबीजाच्या अत्याचारातून मुक्त केले. मातेचे हे उग्र, अक्राळविक्राळ आणि सामर्थ्यशाली रूप अधर्मावर धर्माचा, दुष्ट प्रवृत्तींवर सद्प्रवृत्तींचा आणि अहंकारावर शक्तीचा विजय दर्शवते. मातेच्या या अद्भुत रूपाचे संतकवी विष्णुदास महाराज यांनी एका अष्टकातून अतिशय सुंदर आणि प्रभावी वर्णन केले आहे-

अष्टदंड भुजा प्रचंड, सरळ विक्राळ दाढा।
हाती शूळा, श्रीभुवनात प्रताप गाजवी ।
ब्रह्मांडमाळा गळा, जिव्हा उरस्थळ ।
रुळ लळलळा, कल्यांत काळांतके ।
साष्टांग करितो प्रणाम चरणा, जय जय महाकालिके ।
कोटीच्या शतकोटी बाण सुटती संग्रामे, प्राणार्पणे ।
तेवी रूप प्रचंड देख शमते, मातंड तरांगणे ।
सोडिले तव सुप्रतापे पाहता गर्वास श्रीमयके ।
साष्टांग करितो प्रणाम चरणा, जय जय महाकालिके ।
युद्धीचाप करी फिरें गरगरा चक्रवीरा जडिभूता ।
आरोळी फुटता, धरा थरथरा, कांपे उरी तटतटा ।
साक्षात काळ पळे, बहुं झरझरा, धाके तुझ्या अंबिके ।
साष्टांग करितो प्रणाम चरणा, जय जय महाकालिके ।
अंगी संचारता सक्रोध उठती, ज्वाला मुखी भडभडा ।
भूमी आडकता द्विपाद उठती, शैले मुले तडतडा ।
चामुंडे उरस्त तू घटघटा, महिषासुर प्राशके ।
साष्टांग करितो प्रणाम चरणा, जय जय महाकालिके ।

माता महाकालीचे हे रूप भक्तांसाठी भयाचे नव्हे, तर अधर्माचा नाश करून भक्तांचे रक्षण करणाऱ्या आदिशक्तीचे प्रतीक आहे. तिच्या उपासनेतून मनुष्याला संकटांशी सामना करण्याचे धैर्य, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती आणि जीवनात सत्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा मिळते. ■

उमरखेड, ९४०३६०८११५

नवरात्रीतील नऊ रंग : सामाजिक उत्साह की व्यावसायिक ट्रेंड?

सध्या सर्वत्र नवरात्रोत्साहाची मोठी धामधूम सुरू आहे. या काळात गेल्या काही वर्षांपासून एक विशेष ट्रेंड मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो, तो म्हणजे 'नवरात्रीचे नऊ रंग'. नवरात्र सुरू होण्याच्या आधीपासूनच प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया, जाहिराती आणि मॉल्स यांच्या माध्यमातून 'कोणत्या दिवशी कोणता रंग घालायचा' याची यादी प्रसिद्ध होते. ऑफिस, सोसायट्या आणि विविध ग्रुप्समध्ये रोज ठरवून एकाच रंगाचे कपडे परिधान केले जातात.

आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये (उदा. दुर्गा सप्तशती, देवी भागवत पुराण) नवरात्रीच्या नऊ दिवसांत 'नऊ दुर्गां'ची पूजा-अर्चा आणि उपासना करण्याचे स्पष्ट विधान आहे. पूजेमध्ये देवीला अर्पण करायचे वस्त्र किंवा फुले यांमध्ये रंगांचे निश्चित महत्त्व आहे; उदाहरणार्थ देवीला लाल वस्त्र किंवा तांबडे फूल प्रिय मानले जाते. परंतु, उपासकांनी किंवा भक्तांनी स्वतः रोज नऊ वेगवेगळ्या ठरावीक रंगांचेच कपडे परिधान केले पाहिजेत, असा कोणताही नियम आपल्या मूळ धर्मशास्त्रात दिलेला नाही.

मग या परंपरेची सुरुवात कशी झाली? सोशल मीडियाच्या आगमनानंतर या संकल्पनेने एका व्यापक लाटेचे रूप घेतले. जरी यामागे ज्योतिषातील वारांचे रंग किंवा रंगोपचार यांसारखे निसर्गनियमांवर आधारित काही तर्क जोडले गेले असले, तरी मुख्यत्वे ही एक आधुनिक मार्केटिंग संकल्पना आणि व्यावसायिक ट्रेंड आहे. करण्यात काही वावगे नाही, परंतु या झगमगाटात मूळ नवरात्रीचा आध्यात्मिक गाभा आणि भक्ती मागे पडत चालली आहे का, हा प्रश्न उरतोच.

बऱ्याचदा विशिष्ट रंगाचे कपडे खरेदी करण्याचा अनावश्यक आर्थिक व मानसिक ताणही लोकांवर येतो. नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीची प्रसन्नता आणि कृपा संपादन करण्यासाठी धार्मिक अन् आध्यात्मिक कार्यक्रमांना प्राधान्य देणे अधिक योग्य ठरेल. रंगांचा आनंद जरूर घ्यावा, परंतु त्यालाच धर्मशास्त्र न मानता मूळ भक्ती, उपासना आणि साधना याला प्राधान्य देऊन नवरात्रोत्सव साजरा करणे अधिक सयुक्तिक ठरेल.

ॲड. वैशाली परांजपे/नागपूर

वाचक पत्रे

देवीचा गोंधळ घालणे

नवरात्रात देवीची वेगवेगळ्या प्रकारे उपासना केली जाते. घटस्थापना, पूजा -अर्चना, सप्तशती पाठ, कुंकूमार्चन, घागरी फुंकणे, गरबा अशा वेगवेगळ्या पद्धतीने देवीची आराधना केली जाते. देवीचा गोंधळ घालणे हा महाराष्ट्रात केला जाणारा एक पारंपरिक कुलाचार आहे. महाराष्ट्रात गोंधळाची मोठी परंपरा आहे. वाद्यांच्या (विशेषता संबळ आणि तुणतुणे) नादसुरांमध्ये आदिमायेची आळवणी केली जाते. त्याला 'गोंधळ' म्हणतात.

अंगात झबला, कपाळावर कुंकू, गळ्यात देवीची प्रतिमा आणि कवड्यांची माळ अशा वेशभूषेत आलेल्या व्यक्तीला गोंधळी म्हणतात. हल्ली असे गोंधळी क्वचित दिसतात. देवीचे गुणगान करणाऱ्या व्यक्तीलाही गोंधळी म्हणतात. देवीचा उदो उदो करून संबळ आणि तुणतुणे या वाद्यांच्या साहाय्याने देवीची विविध गाणी म्हणतात. संबळाच्या तालावर केलेल्या नृत्याला 'संबळ गोंधळ' असे म्हणतात. काही गोंधळी काकडे पेटवून गोंधळ घालतात. त्याला 'काकड गोंधळ' असेही म्हणतात. महाराष्ट्रात आजही घरातील लग्नकार्य, नवीन घरबांधणे अशा शुभप्रसंगी देवीचा गोंधळ घालतात. प्रत्येक मनुष्यामध्ये सत्त्व, रज आणि तम हे त्रिगुण आहेत. यालाच त्रिगुणांचा गोंधळ असेही म्हणतात. या त्रिगुणांचा गोंधळ थांबवण्यासाठी देवीला आवाहन करणे यालाच देवीचा गोंधळ घालणे असे म्हणतात.

प्रारंभी गोंधळी वेगवेगळ्या देवतांना गोंधळाला येण्याचे आवाहन करतात. पाटावर किंवा चौरंगावर वस्त्र घालून धान्याच्या राशीवर श्रीफळासह कलश मांडतात. त्यावर उसाच्या पाच ताटांचा मांडव घालून त्याला फुलांच्या माळा बांधतात. याला गोंधळ चौक म्हटले जाते. दिवटे पेटवून संबळीच्या तालावर गीत आणि नृत्य केले जाते. ते ऐकताना आनंदाची अनुभूती येते. आई भवानी, कोल्हापूरची अंबाबाई, रेणुका माता यांनी गोंधळाला यावे म्हणून आळवणी केली जाते. त्यानंतर देवीचे स्तवन सुरू करून अनेक पदे गायिली जातात. गोंधळ्यांकडे अनेक वाद्ये असली तरी त्यापैकी संबळ हे अधिक महत्त्वाचे वाद्य असून त्यासोबत तुणतुणे आणि टाळ ही वाजवतात. संबळच्या आवाजाने नकारात्मक स्पंदने दूर होतात. या गोंधळातून निर्माण झालेली सकारात्मक भावस्थिती टिकवण्यासाठी, तिची सातत्याने अनुभूती घेण्यासाठी सततची उपासना हवी. ती उपासना म्हणजे कुलदेवतेचा नामजप. कुलदेवता माहिती नसल्यास श्री कुलदेवताय नमः असा नामजप करावा. कुलदेवता तुळजाभवानी असेल तर श्रीभवानी दैव्ये नमः असा नाम जप करावा. त्याचप्रमाणे रेणुका दैव्ये नमः अशा पद्धतीने नामजप करू शकतो. आर्ततेने जगदंबेला आळवले तर ती नक्कीच प्रसन्न होते. ■

माधवी पत्की/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

थोडक्यात महत्वाचे.....

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आज जिल्ह्यात

परभणी: केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले दि.१७ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करणार आहेत. दि.१७ रोजी दु.२ वा. सेलू तालुक्यातील हतनूर येथे आगमन होईल. या ठिकाणी ते दुष्काळ सदृश्य परिस्थितीची पाहणी करणार आहेत. दु. २.४५ वा. वालूर येथे दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करतील. दु. ३.१५ वा.परभणी येथील हॉटेल फर्न येथे आगमन व राखीव.त्यानंतर सायं.४.३० वा. गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथे ते दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणीनंतर ते अहमदपूरकडे वाहनाने जाणार आहेत.

दावे-हरकतींसाठी २६ रोजीपर्यंत मुदतवाढ

परभणी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ९५-जिंतूर विधानसभा मतदारसंघातील सेलू तालुक्यातील पात्र मतदारांना मतदार यादीसंदर्भात दावे व हरकती २६ ऑक्टोबर पर्यंत दाखल करता येणार आहेत.दावे व हरकतींचा निपटारा तसेच नोटीस कालावधीची प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहे. पात्र नागरिकांनी मतदार यादीतील नाव व तपशील तपासून आवश्यक दुरुस्ती किंवा नोंदणीसाठी निर्धारित मुदतीत कार्यवाही करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले आहे.

राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेला प्रारंभ

परभणी: क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि परभणी जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन १४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील सुवर्ण जयंती सभागृहात करण्यात आले आहे. या स्पर्धेत राज्यातील आठ विभागांतील खेळाडूंसह क्रीडापीठातील एकूण ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला.स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.इंद्रमणी होते. उपसंचालक शेखर पाटील,डॉ.बाबासाहेब ठोंबरे, डॉ.राजेश कदम, काव्यश्री जाधव, प्रा.डॉ.माधव शेजुळ, धनंजय बनसोडे, रंजीत काकडे, कैलास माने, मिलन वैद्य, कल्याण पोले यांच्यासह विविध अधिकारी व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.स्पर्धा यशस्वीतेसाठी सुयश नाटकर, रोहन औंडेकर, मिलिंद साळवे, गजानन तोडणे, प्रकाश पंडित, योगेश आदमी, धीरज नाईकवाडे आदींनी परिश्रम घेतले.

बोबडे माध्यमिक विद्यालयात वाचन 'प्रेरणा दिन'

झरी: कै.बाबारावजी बोबडे पाटील माध्यमिक विद्यालयात डॉ.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली.अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विष्णू गावंडे हे तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षक बालासाहेब कदम हे होते. यावेळी गावंडे यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जीवनपट विद्यार्थ्यासमोर उलगडून दाखवला व सामान्य विद्यार्थ्यापासून असामान्य व्यक्ती कसा बनला यांचे सविस्तर वर्णन विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांचे गुण अंगी करावे आत्मसात करावे म्हणून शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन घेण्यात आला.प्रमुख पाहुणे कदम यांनी वाचनाचे महत्त्व जीवनामध्ये महत्त्वाचे आहे हे विशद केले. विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणामध्ये बसून वाचनालयातील पुस्तके एक तास शांततेत वाचन केले.यशस्वीतेसाठी प्रमोद कांबळे, राम भोसले, रंगनाथ राठोड, भानुदास जाधव, राजेभाऊ शिंपले, दामोदर गायकवाड, श्रीमती धनगे, नामदेव वईद, सिद्धेश्वर करवर आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन राठोड यांनी तर आभार शिंपले यांनी मानले.

चाटोरी येथील नाईक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

पालम: चाटोरी येथील मराठवाडा सार्वजनिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नाईक विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उपस्थित होते यावेळी प्राध्यापक जामनिक यांनी विद्यार्थ्यांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्राचा सांगितला. त्यांच्या संघर्षमय जीवनाचा, वैज्ञानिक क्षेत्रातील योगदानाचा, देशसेवेचा आणि विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रेरणादायी संदेशांचा परिचय करून दिला. तसेच विद्यार्थ्यांनी कलाम यांच्याप्रमाणे मोठी स्वप्ने पाहावीत, कठोर परिश्रम करावेत,वाचनाची आवड जोपासावी आणि आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुधारित वेतनवाढीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन

समान काम, समान वेतन तत्वानुसार वेतनवाढीची मागणी, दिवाळी साजरी करणार नाही

परभणी (प्रतिनिधी): उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार सुधारित वेतनवाढ लागू करावी, या मागणीसाठी परभणी जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी १६ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने आंदोलन केले. मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन केले.

मुंबई उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनवाढ देण्यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. मात्र, सुमारे २० महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही हा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. शासनाचे या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन लघुलेखक संघटना, शाखा परभणी, परभणी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-क, परभणी जिल्हा बेलीफ संघटना आणि परभणी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-ड या चार संघटनांतील कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

यापूर्वीही कर्मचाऱ्यांनी एक दिवस काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने कामकाज केले होते. मात्र, त्यानंतरही सुधारित वेतनवाढीच्या प्रस्तावावर निर्णय न झाल्याने पुन्हा आंदोलन करण्याची वेळ आल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. मागण्या मान्य न झाल्यास दिवाळी साजरी न करण्याचा निर्धारही यावेळी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. दरम्यान, १७ ऑक्टोबर रोजीही अशाच पद्धतीने आंदोलन करण्यात येणार आहे.

जिंतुर तालुक्यात एक दिवस एक पुस्तक उपक्रम

जिंतुर (प्रतिनिधी): वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून तालुक्यात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचनसंस्कृती रुजावी यासाठी 'एक दिवस एक पुस्तक अनेक वाचक' हा विशेष तालुकास्तरीय उपक्रम अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला.

पं.स.चे गटशिक्षणाधिकारी प्रगती नेवल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमाला तालुक्यातील शाळांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील जवळपास २२२ शाळांमध्ये हा उपक्रम एकाच दिवशी यशस्वीरीत्या राबविण्यात आला, ज्यामध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सुकतेने आणि आनंदाने सहभाग नोंदवला.या उपक्रमांतर्गत जिंतूर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांचे वाचन केले नाही, तर बालसाहित्यातील अनेक दर्जेदार पुस्तकांचा आस्वाद घेतला. यामध्ये साने गुरुजींची अजरामर कृती 'श्यामची आई', रंजक आणि बोधप्रद 'जादूची कांडी', एकता,कथा आपुलकीच्या,वाचवा आणि संघटितपणाचा संदेश देणारे पुस्तक 'एकीचे बळ', स्त्री शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या क्रांतीज्योतीवर आधारित'ऐका मी सावित्री बोलते', समाजसुधारकांच्या विचारांची ओळख करून देणाऱ्या 'गाडगेबाबांच्या गोष्टी' तसेच विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा भरणारे पुस्तक 'नवा संकल्प' अशा एक ना अनेक प्रेरणादायी पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी मोठ्या आवडीने प्रकट वाचन केले.

प्रत्यक्ष पीक कापनी प्रयोगाच्या आधारे पीक विमा द्या

मानवत (प्रतिनिधी): तालुक्यातील खरीप हंगामात पावसाच्या दीर्घ खंडामुळे सोयाबीन, कापूस आणि तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पीक विमा मंजुरीसाठी उपग्रह आधारित सर्व्हेची अट शिथिल करून प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगांच्या आधारे नुकसानभरपाई निश्चित करावी, अशी मागणी समस्त शेतकरी बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यंदा पावसाने मोठी दडी मारल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीनच्या शेंगांमध्ये दाणे न भरणे, कापसाची पातेगळ व बोंडगळ होणे यांसारख्या समस्यांमुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. मात्र, उपग्रह छायाचित्रांमध्ये पिकांचे हिरवे आवरण दिसत असले, तरी प्रत्यक्ष उत्पादनाची स्थिती त्यातून स्पष्ट होत नाही. त्यामुळे उपग्रह सर्व्हेच्या आधारे पीक नुकसानीचे मूल्यमापन केल्यास शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली. पीक विमा भरपाई निश्चित करताना प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगांतून प्राप्त होणारे उत्पादन, तसेच महसूल व कृषी विभागाच्या नोंदी आणि नुकसानीच्या अहवालांना योग्य महत्त्व द्यावे. उपग्रह सर्व्हेच्या अटींचा अडथळा दूर करून बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार संपूर्ण नुकसानभरपाई मिळावी, यासाठी संबंधित विमा कंपन्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली.दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात तातडीने शासनस्तरावर पाठपुरावा करावा आणि मानवत तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी ज्ञानेश्वर धोपटे, रितेश कदम, अनिल चौधरी, विष्णू हारके, सुखदेव कदम, अशोक धोपटे यांच्यासह मानवत तालुक्यातील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

परभणी तालुक्यातील टाकळी येथे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी केली.यावेळी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीषा माथुर, उपविभागीय अधिकारी उदयसिंग भोसले, तहसिलदार डॉ. संदिप राजापुरे, जि.प.सदस्य प्रभाकर जैस्वाल, गटविकास अधिकारी पी.एम. जाधव, कृषी अधिकारी नांदे, मधुकर क्षिरसागर आदी. (छाया: राहुल धबाले, परभणी)

वांगी शिवारात चार एकरांतील सोयाबनची गंजी जळाली

शेतमालक मुंजाजी राऊत यांना मोठा आर्थिक फटका, अज्ञान व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

परभणी (प्रतिनिधी): वांगी शिवारात शेतकरी मुंजाजी राऊत यांच्या गट क्रमांक ३५५ मधील चार एकरांतील सोयाबीनची गंजी अज्ञात व्यक्तीने जाळून टाकल्याची घटना समोर आली आहे. या आगीत अंदाजे चार ते पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून, या घटनेमुळे शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात आहे.

शेतकरी मुंजाजी राऊत यांनी गट क्रमांक ३५५ मधील चार एकर क्षेत्रातील सोयाबीनचे पीक घेतले होते. वर्षभर मेहनत करून, बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च करून त्यांनी पीक उभे केले होते. मात्र, अज्ञात व्यक्तीने सोयाबीनची गंजी जाळून टाकल्याने त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. शेतीसाठी केलेला खर्च आणि पिकातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आशेवर शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन अवलंबून असते. अशा परिस्थितीत काढणी केलेल्या शेतमालाची गंजीच जाळून टाकण्यात आल्याने मुंजाजी राऊत यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना मोठा फटका यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे आणि शेतीतील वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. पिकांचे उत्पादन, बाजारभाव आणि शेतीसाठी केलेल्या खर्चाची भरपाई याबाबत शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत. अशा परिस्थितीत शेतातील सोयाबीनची गंजी जाळून टाकण्याचा प्रकार घडल्याने शेतकऱ्यांच्या अडचणींत आणखी भर पडली आहे.शेतकरी मोठ्या कष्टाने पिकवलेल्या शेतमालाचे अशा प्रकारे नुकसान होत असल्याने शेतीमालाच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या घटनेमागील नेमके कारण काय, तसेच या कृत्यामागे कोणाचा हात आहे, याचा तपास होणे आवश्यक आहे.

एसआयआर कामकाजात गंगाखेड मतदार संघ अव्वल

गंगाखेड (प्रतिनिधी): मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कामकाजात गंगाखेड विधानसभा मतदारसंघाने ९६.४२ टक्के काम पूर्ण करत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार माधवराव बोथीकर, कैलास वाघमारे, उषाकिरण श्रगारे यांच्यासह सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, बीएलओ, पर्यवेक्षक, तलाठी, मंडळाधिकारी तसेच पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या समन्वित प्रयत्नांतून हे यश साध्य झाले आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे गंगाखेड मतदारसंघाने राज्यात अव्वल स्थान मिळविले असून, उर्वरित कामकाजही पूर्ण करण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वतीने परभणी शहरातील वसमतरोड भागातील महामार्गावरील अतिक्रमणे जमिनदोस्त करण्यात आली. (छाया: शैलेश डहाळे, परभणी)

पदवीधर निवडणुकीत नियमांचे पालन करा: काळे

परभणी (प्रतिनिधी): औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दक्षतेने कर्तव्ये बजावावीत, असे निर्देश अपर विभागीय आयुक्त डॉ.प्रताप काळे यांनी दिले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात क्षेत्रीय अधिकारी,मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.यावेळी निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्पे,मतदान केंद्रावरील जबाबदाऱ्या, मतपेटी हाताळणे, मतपत्रिका वापरणे, मतपेटी सीलबंद करणे आणि आवश्यक प्रपत्रे भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मतपेटी हाताळण्याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी मतदान प्रक्रियेची माहिती देताना, पसंतीक्रमानुसार मतदानासाठी निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेनचाच वापर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. मतदान साहित्य ताब्यात घेताना सर्व साहित्याची तपासणी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, संगीता चव्हाण, शैलेश लाहोटी, उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव तसेच तहसीलदार व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

५१ वर्षाच्या स्नेहबंधांचा अनोखा सोहळा परभणीत उत्साहात

अमेरिकेतुन आलेल्या डॉ. सुषमा भार्गवर यांचा सन्मान, जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीने आठवणींना उजाळा, १९७५ ते २०२६ मैत्रीचा प्रवास

परभणी (प्रतिनिधी): बाल विद्यामंदिर शाळेच्या १९७५ च्या बॅचमधील वर्गमित्र-मैत्रिणींचा 'प्रवास मैत्रीचा १९७५ ते २०२६ ५१ वर्षांचा स्नेहबंध' हा स्नेहमेळावा गुरुवार, दि. १५ रोजी वसमत रोडवरील चतुर्थी हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल ५१ वर्षांच्या मैत्रीला उजाळा देणाऱ्या या सोहळ्यात जुन्या आठवणी, सन्मान, संगीत, विनोद आणि आपुलकीच्या संवादाने उपस्थितांची मने जिंकली.

१९७५ च्या वर्गातील मैत्रीण डॉ. सुषमा भार्गव या १९८७ पासून अमेरिकेत वास्तव्यास आहेत. शाळेला आणि जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्यासाठी त्या परभणीत आल्या असता, त्यानिमित्ताने वर्गमित्र डॉ. श्रीकृष्ण कातनेश्वरकर आणि मित्रमंडळींनी या स्नेहमेळाव्याचे आयोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी डॉ. सुषमा भार्गव यांच्या हस्ते धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून झाली. डॉ.कृष्णा महेश जोशी, विलास जहागीरदार, सौ. संजीवनी जोशी गोडसे आणि सौ. पिंगळीकर यांच्या हस्ते दीपपूजन करण्यात आले. यावेळी डॉ. सुषमा भार्गव यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 'आदर्श जागतिक नारी शक्ती २०२६' सन्मानाचे मेडल व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच परभणीच्या असून सध्या छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास असलेल्या सौ. संजीवनी जोशी गोडसे यांनाही 'आदर्श भारतीय नारी शक्ती २०२६' सन्मानाचे मेडल, मानचिन्ह आणि त्यांच्या कार्याचा गौरव करणारे पत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित सौ. पिंगळीकर वहिनी आणि सौ. नखाते मॅडम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर दिवंगत वर्गमित्रांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. डॉ. कृष्णा यांनी प्रमुख अतिथींसह उपस्थितांचा परिचय करून दिला. महेश जोशी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडत आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सर्व वर्गमित्र-मैत्रिणींनी आपला परिचय करून देत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमात मनोरंजनाचीही खास मेजवानी होती. व्यवसायाने डेंटल सर्जन असलेले यशवंत पाटील यांनी आपल्या विनोदी शैलीत हास्यजत्रा आणि स्टँडअप कॉमेडी सादर करून उपस्थितांना खळखळून हसवले.उमाकांत पाटील यांचे गायन, डॉ. कृष्णा यांची गाणी तसेच सौ. कातनेश्वरकर वहिनी यांचे गायन यांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. किरण पिंगळीकर यांनीही स्टँडअप कॉमेडी आणि गाण्यांच्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.या स्नेहमेळाव्यात मित्रमंडळींच्या वतीने डॉ. कृष्णा यांना 'आदर्श मित्र २०२६' हे सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

५१ वर्षांचा मैत्रीचा प्रवास म्हणजे केवळ काळाचा टप्पा नसून, जपलेल्या नात्यांचा, आठवणींचा आणि परस्परांवरील प्रेमाचा अमूल्य ठेवा आहे. शालेय जीवनात जुळलेली मैत्री आजही तितक्याच आत्मीयतेने टिकून असल्याचा प्रत्यय या स्नेहमेळाव्यातून आला. सर्व वर्गमित्र-मैत्रिणींच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अग्रिम अर्थसहाय्य: भरोसे

परभणी (प्रतिनिधी): राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसाहाय्य देण्याच्या निर्णयाचे भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी स्वागत केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना केल्याचे सांगत त्यांनी सरकारचे अभिनंदन केले. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीसारखे निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे भरोसे यांनी नमूद केले. दुष्काळीपरिस्थितीतशेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, अशा सूचना सरकारने दिल्याचेही त्यांनी सांगितले.पीएम किसान सन्मान निधी, नमो शेतकरी महासन्मान निधी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि पीकविमा यांसारख्या योजनांमधून शेतकऱ्यांना आधार मिळत असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच कृषी पंपांच्या वीजबिलाबाबत सवलती, चारा नियोजन आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी भाऊबीज देण्याच्या निर्णयाचाही त्यांनी उल्लेख केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

इटोली ते भोगाव देवी रस्त्याची दुरावस्था

पंचायत समिती सदस्या रंजना बालाजी सांगळे यांचा स्वखर्चातुन दुरूस्तीसाठी पुढाकार

जिंतुर (प्रतिनिधी): तालुक्यातील ईटोली ते भोगाव देवी या रस्त्याची दयनीय अवस्था झाली. या रस्त्यावरून भोगाव येथील जगदंबा देवीच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे भाविकांसह वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन पंचायत समिती सदस्या रंजना बालाजी सांगळे यांनी पुढाकार घेत स्वखर्चातून या रस्त्याची दुरुस्ती करून घेतली.

जिंतूर तालुक्यातील भोगाव येथील जगदंबा माता देवस्थान हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात येथे देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. त्याचबरोबर ईटोली आणि परिसरातील नागरिकही मोठ्या संख्येने या देवस्थानाला भेट देतात. त्यामुळे ईटोली ते भोगाव देवी हा रस्ता भाविकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, या रस्त्याची अवस्था खराब झाल्यामुळे भाविकांना प्रवास करताना अडचणी येत होत्या. रस्त्यावरील खड्डे आणि दुरवस्थेमुळे दुचाकी, चारचाकी वाहनधारक तसेच इतर प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांची संख्या वाढत असल्याने या रस्त्याच्या दुरुस्तीची गरज प्रकर्षाने जाणवत होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन पंचायत समिती सदस्य रंजना बालाजी सांगळे यांनी केवळ समस्येकडे लक्ष वेधण्यापुरते मर्यादित न राहता स्वखर्चातून रस्त्याच्या दुरुस्तीचा पुढाकार घेतला. त्यांच्या या उपक्रमामुळे भोगाव देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना तसेच परिसरातील नागरिकांना दिलासा मिळण्यास मदत झाली आहे. सार्वजनिक रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभाल ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी असली, तरी नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर तातडीने उपाय करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणेही महत्त्वाचे ठरते. ईटोली ते भोगाव देवी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रंजना बालाजी सांगळे यांनी स्वखर्चातून केलेला पुढाकार हा सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तात्पुरत्या स्वरूपातील दुरुस्तीमुळे नागरिकांना दिलासा मिळत असला,

ईटोली ते भोगाव देवी या मार्गाची कायमस्वरूपी दुरुस्ती करून रस्ता सुस्थितीत ठेवण्याची गरज आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनाने या मार्गाची पाहणी करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि रस्त्याचे दर्जेदार काम करावे, अशी अपेक्षा भाविक व परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पालम येथे पावसाळ्यातही पाणी टंचाईचे चटके

पालम (प्रतिनिधी): तालुक्यात अपुऱ्या पावसामुळे पाणीटंचाईचे संकट गडद होत असून, पावसाळ्यातही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत जलजीवन मिशन आणि ६२ गावांच्या पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तालुक्यातील अनेक भागांत विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत घट होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही ६२ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. योजनेतील कामाचा दर्जा, नियोजन आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची स्थिती यांची चौकशी करण्याची मागणीही होत आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित गावांतील परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच जलजीवन मिशन आणि ६२ गावांच्या पाणीपुरवठा योजनेतील अडचणी दूर करून नागरिकांना नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. याबाबत तालुका प्रशासनाने त्वरित दखल घेऊन पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

थोडक्यात महत्वाचे.....

विद्यापीठ युवक महोत्सवाच्या संयोजन समितीवर प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे

परभणी: ज्ञानोपासक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तथा सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. पंढरीनाथ धोंडगे यांची स्वा. रा.ती.म.विद्यापीठाच्या युवक महोत्सवाच्या संयोजन समितीवर सदस्य म्हणून निवड झाली आहे. सदर निवड कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केली आहे. परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातूर या चार जिल्ह्यासांठीचा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव ज्ञानतीर्थ–२०२६ हा नांदेड येथील सायन्स कालेजमध्ये १६ ते १९ या कालावधीत संपन्न होत आहे.या संयोजन समितीवर प्रा. पंढरीनाथ धोंडगे यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माजीमंत्री अ‍ॅड. गणेशरावजी दुधगावकर, सचिव डॉ.सौ. संध्याताई दुधगावकर, सहसचिव इंजि. समीर दुधगावकर, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे, उपप्राचार्य डॉ. शाम गोरे, डॉ. राजपालसिंह चिखलीकर, इंजि.नारायण चौधरी, डॉ. मारोती गायकवाड आदींनी अभिनंदन केले आहे.

नोकरीचे आमिष दाखवून ७ लाखांची फसवणूक

परभणी : मुलाला शाळेत सेवक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ७ लाख रुपये घेतल्याची तक्रार पालम तालुक्यातील रावराजूर येथील अजगर शेख मुसा यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.याप्रकरणी संदीप जामगाये यांच्याविरुद्ध चौकशी करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, नोकरी न मिळाल्याने पैसे परत मागितल्यानंतर १७ जून २०२५ रोजी ५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. मात्र खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो वटला नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

शांताबाई वाघमारे यांचे निधन

जिंतुर: शहरातील आदर्शनगरमध्ये राहणाऱ्या जेष्ठ महिला ग.भा.शांताबाई रंगनाथराव वाघमारे यांचे वृद्धपकाळाने बुधवार दि १४ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या वय ८२ वर्ष वयाच्या होत. त्यांच्या पार्थिवावर शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,तीन मुली,जावई, सून,नातवंडे असा परिवार आहे. त्या उप शिक्षणाधिकारी परभणी तथा गट शिक्षणाधिकारी सेलू गजानन वाघमारे यांच्या आई होत.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी केले सामुहीक वाचन

परभणी: महात्मा फुले विद्यालयात डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले.अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक कथाकार राजेंद्र गहाळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य लखनसिंह जाधव, तर प्रमुख वक्ते म्हणून कविवर्य शिवाजी गणपुरकर, रविराज खंडागळे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी बालासाहेब भोसले उपस्थित होते. भारत खंदारे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य लखनसिंह जाधव यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयी आत्मीयता वाढावी, या उद्देशाने आयोजित उपक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.सूत्रसंचालन प्रद्युम्न शिंदे यांनी तर पांडुरंग जगताप यांनी आभार मानले.यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभागातील भारत खंदारे,अमरनाथ कसबे, रविकुमार शिंदे, श्रीनिवास जांभळकर आदींनी परिश्रम घेतले.

जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत स्मृती खोडवेचे यश

परभणी: जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत एन.व्ही.एस.मराठवाडा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेत शाळेची खेळाडू स्मृती मारुती खोडवे हिची ११ वर्षांखालील (यू–११) गटातून विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धेत स्मृती हिने वेग आणि कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी केली. तिच्या यशासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक नितीन बिरादार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल अध्यक्ष विजय जोशी, अनिल अष्टुरकर, दिलीपराव कुलकर्णी, संतोष धारासुरकर, मुख्याध्यापक अनंत पांडे, श्रीनिवास मुंदडा, व्यंकटेश तोरंबेकर यांच्यासह प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ढगे, उपमुख्याध्यापक बाळकृष्ण कापरे, सूर्यकांत पाटील, सुनील रामपूरकर, नंदकिशोर साळवे, विश्वास दिवाळकर, प्रा. सुनील तुरुकमाने, शिवप्रसाद कोरे, श्रीपाद कुलकर्णी, अभिजीत कुलकर्णी, गोपाळ रोडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्मृतीचे अभिनंदन केले.

माजी राष्ट्रपती कलाम यांना अभिवादन

परभणी : माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा नियोजन समिती सभागृहात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते.

तुळजाभवानी शुगरच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

जिंतुर (प्रतिनिधी): आडगाव (दराडे) येथील श्री तुळजाभवानी शुगर प्रा. लि. कारखान्याच्या मोळीपूजनासह गळीत हंगामाचा शुभारंभ चेअरमन भावना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मीनाताई बोर्डीकर, सचिन मुंगसे पाटील आणि सचिन गोरे यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट विवेक भारद्वाज, जनरल मॅनेजर विजय मते, वर्क्स मॅनेजर टोकलवाड, चीफ केमिस्ट कटियार, मुख्य शेतकी अधिकारी पाटील, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी व वाहतूक कंत्राटदार तसेच कारखान्याचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, साखर कारखाना शेतकरी, कामगार आणि परिसराच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावतो. यंदाचा गळीत हंगाम यशस्वी करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ मिळवून देणे, कामगारांच्या कष्टांचा सन्मान राखणे आणि कारखान्याची प्रगती साधणे हे उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.आधुनिकीकरणानंतर सुरू झालेला हा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस कारखान्याकडे पाठवावा, असे आवाहन चेअरमन भावना बोर्डीकर यांनी केले. चालू हंगामात सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सक्षम तोडणी व वाहतूक यंत्रणा आणि अद्ययावत मशिनरीच्या बळावर हे उद्दिष्ट पूर्ण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. गळीत हंगाम यशस्वी होण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी व वाहतूक कंत्राटदार तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

परभणी शहरातील जूना पेडगांव रस्त्यावरील सदगुरू नगरातील सप्तशृंगी माता नवरात्र महोत्सवानिमित्ताने आयोजित दांडियाला महिलांनी मोठा प्रतिसाद दिला. या दांडिया रासचे आयोजन शुभम हाके यांच्यासह मित्र परिवाराने केले आहे.

जिंतुर तहसिल कार्यालयासमोर काँग्रेसचे धरणे आंदोलन

जिंतुर (प्रतिनिधी): तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत देऊन ही रक्कम दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी आज जिंतूर तहसील कार्यालयासमोर काँग्रेस पक्षाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

यंदाच्या हंगामात पावसाने दडी मारल्याने जिंतूर तालुक्यातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसह इतर पिकांवर पावसाअभावी प्रतिकूल परिणाम झाला असून, शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. खरीप हंगामासाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देणे आवश्यक असल्याची भूमिका काँग्रेस पक्षाने आंदोलनाद्वारे मांडली. काँग्रेसच्या वतीने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये दुष्काळी आर्थिक मदत द्यावी आणि मदतीची रक्कम दिवाळीपूर्वी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी मागणी करण्यात आली. दिवाळीचा सण जवळ आला असताना शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने सण साजरा करणे, कुटुंबाचा खर्च भागवणे आणि शेतीसाठी घेतलेली देणी फेडणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता आर्थिक मदत जाहीर करून तिचे तातडीने वाटप करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. यासोबतच निवडणूक प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदवत मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही आंदोलनातून करण्यात आली.शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तहसील कार्यालयासमोर हे धरणे आंदोलन करण्यात आले. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी आणि त्यांच्या मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका काँग्रेस पक्षाच्या वतीने मांडण्यात आली. मागणीचे निवेदन जिंतूरचे नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्याकडे देण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व काँग्रेस जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांनी केले. यावेळी तालुका अध्यक्ष केशवराव बुधवंत, नागसेन भेरजे, सय्यद फिरोज, शहराध्यक्ष इस्माईल भाई पैलवान, नगरसेवक माजभाई, नगरसेवक अकबर भाई, नगरसेवक प्रदीपराव देशमुख, रामप्रसाद महागडे, अनिल गाडेकर, वसीम पठाण, नगरसेवक यादराव थिटे, अ‍ॅड. पुष्पाताई उबाळे, अंकुश राठोड आदींसह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

लक्ष्मी नृसिंह शुगर्सचे बॉयलर अग्नी प्रदीपन

परभणी (प्रतिनिधी): आमडापूर येथील श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्स एल.एल.पी.कारखान्यात नवव्या बॉयलरचा अग्नी प्रदीपन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कारखान्याच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या सोहळ्याला कारखान्याचे चेअरमन तथा आ. डॉ.राहुल पाटील यांच्यासह संचालक प्रमोद जाधव, माधुरीताई प्रमोद जाधव, ज्येष्ठ मार्गदर्शक वेदप्रकाश पाटील, अ‍ॅड.न.चि. जाधव यांची उपस्थिती लाभली.

साखर उद्योगात उत्पादन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री आणि तांत्रिक सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.या प्रक्रियेत बॉयलरची भूमिका महत्त्वाची असल्याने नवव्या बॉयलरचे अग्नी प्रदीपन हा कारखान्याच्या औद्योगिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.कारखान्याच्या वाढत्या गरजा, उत्पादन प्रक्रियेची कार्यक्षमता आणि आगामी कामकाजाच्या नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधांची उभारणी महत्त्वाची ठरते. या पार्श्वभूमीवर नवव्या बॉयलरच्या अग्नी प्रदीपन सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतमध्ये दिवस–रात्र मैदानी स्पर्धा

मानवत (प्रतिनिधी): स्वाराती मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि के.के.एम.महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १० व ११ रोजी आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

महाराष्ट्रातील पहिल्या रात्र–दिवस आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत विद्यापीठाच्या ए, बी, सी व डी झोनमधील सुमारे २०० खेळाडूंनी सहभाग घेतला. १००, २००, ५००, १००० व ५००० मीटर धावणे, रिले आणि लांब उडी या प्रकारांत खेळाडूंनी कौशल्य दाखविले.स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अनिलराव नखाते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. एन. देशमुख उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव बालकिशन चांडक, संचालक दिलीपराव हिबारे, संजय लड्डा, प्राचार्य डॉ.बी.

एस. मुंडे, डॉ.महेश वाकरडकर, डॉ.अभिजीत सरनाईक, डॉ. प्रशांत चव्हाण, रणजीत काकडे आणि डॉ. गुरुद्वास लोकरे उपस्थित होते.यावेळी डॉ.भास्कर माने यांनी स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. तसेच आगामी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धा के. के. एम. महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा केली. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी क्रीडा संचालक डॉ. पवन पाटील, कार्यालयीन अधीक्षक गणेश उबाळे, डॉ. कैलास बोरुडे, सुरेश होगे आणि खो–खो खेळाडूंनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. विनोद हिबारे यांनी केले, तर आभार प्रा. अनिल सोळंके यांनी मानले.

ऐन नवरात्रीत वीजेचा लंपडाव सुरूच

परभणी : परभणी शहरासह ग्रामीण भागात ऐन नवरात्रीच्या उत्सव काळात वीजेचा लंपडाव सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नवरात्र उत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला असुन सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने महिला, युवतींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असुन काही मंडळाने आकर्षक असे देखावेही साकारले आहेत. त्यामुळे देवी मंदिरासह दुर्गा मंडळाच्या ठिकाणी भाविकांची गर्दी होत असते मात्र अशातच वीजेचा लंपडाव सुरू झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

किन्होळा पुलाचे काम कासवगतीने सुरू

मानवत (प्रतिनिधी): मानवत तालुक्यातून परभणीकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील किन्होळा–खरवडे पाटीजवळील पुलाचे बांधकाम संथगतीने सुरू असल्याने वाहनचालकांसह नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सदर पुलाची दुरावस्था झाल्याने तो वाहतुकीसाठी धोकादायक बनला होता. काही महिन्यांपूर्वी या पुलावर मोठा अपघात झाल्याने जीवितहानीही झाली होती. त्यानंतर धोकादायक पूल वाहतुकीसाठी बंद करून पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली.

मात्र, पर्यायी मार्गावरून दररोज हजारो वाहने धावत असल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. धुळीमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून, अपघाताचा धोकाही वाढला आहे. पुलाचे काम संथगतीने सुरू असल्याने प्रवाशांच्या अडचणींमध्ये भर पडत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने पुलाच्या बांधकामाला गती देऊन ते युद्धपातळीवर पूर्ण करावे आणि वाहनचालकांसह नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी हेक्टरी ५० हजार मदत द्या

परभणी काँग्रेस तालुका कमिटीची मागणी, पदाधिकाऱ्याचे धरणे आंदोलन

परभणी (प्रतिनिधी): परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हक्कांच्या मागण्या मान्य करण्यात यासाठी परभणी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

(छाया: राहुल धबाले, परभणी)

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक दिलासा मिळावा,अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.यासोबतच मतदान प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप करत, मुख्य निवडणूक आयुक्तांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी परभणी तालुका काँग्रेस कमिटीने हे आंदोलन आयोजित केले.शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळावी, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याच्या मागणीवर शासन काय भूमिका घेते, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले. या धरणे आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शेख सलमान शेख युनुस, आशिष हरकळ, जि.प. सदस्य जितेंद्र देशमुख, शेख नासेर. युवक जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, जि.प. सदस्य गणेश घाडगे, मनपा गटनेते गुलमीर खान, नगरसेवक सुनील देशमुख, इम्रान हुसेनी, सुहास पंडित, ज्ञानेश्वर वाघमारे, शेषराव देंडगे, प्रसाद डुकरे, बालासाहेब सामाले, शेख मुजमील, अरुण गव्हाणे, करण कांबळे, दीपक पवार, अशोक पवार, विष्णू गायकवाड, निखिल मांडे, मारोती नंद, विनोद कांबळे, बाबासाहेब खरात, दीक्षा शेळके, अलका भालेराव, सोनाली भालेराव, आम्रपाली शिंदे, मंगल गरुड, शोभा सोनकांबळे, विजयमाला दहे, पद्मावती शिसोदे, जानवी दहे, नाझिमा अन्सारी, मोबिन खुरेशी, युसुफ खान यांच्यासह शेतकरी व काँग्रेस पदाधिकारी या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

भरधाव कारच्या धडकेत ऑटो चालकाचा मृत्यू

गंगाखेड (प्रतिनिधी): शहरातील भगवती कॉर्नर येथे भरधाव कारने समोरून येणाऱ्या ऑटोला जोरदार धडक दिल्याने ऑटोचालकाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवार दि.१३ रोजी घडली.

गंगाखेड बसस्थानकाकडून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने (क्र. एमएच २२ बीसी ७६१७) समोरून येणाऱ्या ऑटोला (क्र.एमएच २२ एफ २३४८) जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोचालक लखन नामदेव वायसे हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले. राम वायसे, असिम खुरेशी, काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख युनूस, नगरसेवक अ‍ॅड. सय्यद अकबर आणि आदनान खान यांनी त्यांना तातडीने गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली बडे आणि डॉ.मयुरी जाधव यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.या प्रकरणी राम नामदेव वायसे यांच्या फिर्यादीवरून कारचालकाविरुद्ध गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मारोती माहोरे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

वाचन संस्कृती ही समृध्द समाजाचा पाया- साहित्यिक अशोक अर्धापूरकर

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

लहान वयातच मुलांना चांगल्या पुस्तकांची ओळख करून दिल्यास उद्याचे ते सुजाण नागरिक घडण्यास मदत होईल. वाचनसंस्कृती ही समृद्ध समाजाचा पाया असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूरकर यांनी केले.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. तसेच यावेळी सेवा संकल्प अभियानात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी प्राचार्य सी. के. देशपांडे, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ व जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, जी. पी. मुपकलवार आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या उपसंपादक अलका पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांच्यासह शिक्षक, शालेय विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना ग्रंथालयाची पाहणी घडवून आणण्यात आली. यावेळी ग्रंथालयातील ग्रंथसंपदा, महिला व बाल विभाग, संदर्भग्रंथ विभाग तसेच ग्रंथालयाच्या कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रम पुरते मर्यादित न राहता अवांतर वाचनाची गोडी जोपासावी. पुस्तके हीच आपली खरी मित्र आणि मार्गदर्शक असून, वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि विचारांचा विकास होतो, असे मत जिल्हा माहिती कार्यालयाच्या उपसंपादक अलका पाटील यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद केले. डॉ. कलाम यांचा वाचनाचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि नव्या पिढीमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी ग्रंथालय विभाग प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांसह सर्व वाचनप्रेमींनी ग्रंथालयाचे सभासद होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

या उपक्रमात सरजुदेवी भिकुलाल भारुका आर्य कन्या विद्यालय आणि सत्यनारायण विद्या मंदिर येथील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी सी. के. देशपांडे, खंडेराव सरनाईक आणि जी. पी. मुपकलवार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना दररोज किमान एक तास अवांतर वाचन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन करून डॉ. कलाम यांना अभिवादन केले.

समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन

१७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

'समान काम, समान वेतन' या न्याय्य मागणीसाठी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने आंदोलनाचा दुसरा टप्पा म्हणून दि १६ ऑक्टोबर रोजी जिल्हा न्यायालय हिंगोलीच्या प्रांगणात कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून आंदोलन केले.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनवाढीचा लाभ देण्यात आला आहे. याच धर्तीवर राज्यातील सर्व जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही हीच वेतनवाढ लागू करण्यात यावी, या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे शस्त्र उपसले आहे.

आंदोलनाचा पहिला टप्पा १६ सप्टेंबर रोजी कर्मचाऱ्यांनी हाताला काळी फीत लावून राज्यव्यापी आंदोलन केले होते. दुसरा टप्प्यात १६ ऑक्टोबर आणि १७ ऑक्टोबर रोजी सलग दोन दिवस कर्मचाऱ्यांकडून काळी फीत लावून काम करत विरोध दर्शवला जात आहे. तर तिसऱ्या टप्प्यात शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास, येत्या ५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एकदिवसीय सामूहिक रजा आंदोलन करणार आहेत. तसेच चौथ्या टप्प्यात 'समान काम, समान वेतन' ही मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असून शासनाने यावर तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा होणाऱ्या परिणामांना शासन जबाबदार राहील, अशी माहिती जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना (गट-क) हिंगोलीचे अध्यक्ष सतीश विठ्ठलराव देशमुख यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

एबीएम इंग्लीश स्कुलमध्ये किशोवयीन मुलींशी संवाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

शहरातील ए.बी.एम. इंग्लिश स्कुलमध्ये किशोरवयीन मुलींशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पालकांमध्ये वाढत असलेली आपल्या किशोरवयीन मुलींची काळजी यामुळे किशोरवयीन मुलींमध्ये जनजागृती होणे आवश्यक होते. मुलींनी स्वत:ची काळजी स्वत: घ्यावी या बाबत त्यांना माहिती मिळावी यासाठी शाळेने हा उपक्रम राबविला होता.

या संवाद कार्यक्रमासाठी शहरातील प्रसिद्ध डॉ. प्रणिता झडपे तसेच महिला मार्गदर्शक सौ. श्रद्धा बांगर व स्नेहल कानडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी मुलींनी आपली काळजी कशी घ्यावी यासाठी मागदर्शन करण्यात आले. डॉ. प्रणिता झडपे यांनी मुलींना मासिक पाळी बद्दल संपुर्ण माहिती दिली तसेच मासिक पाळी पुर्वीचे लक्षणे, मासिक पाळीमध्ये घ्यावयची काळजी, मासिक पाळीबद्दलची अंधश्रद्धा आदी विषयी माहिती दिली. तसेच काही समस्या उद्भवल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला.

या वेळी सौ. श्रद्धा बांगर यांनी मुलींशी संवाद साधताना मुलींच्या अडचणी जाणुन घेतल्या तसेच त्यांना आरोग्य व सुरक्षतेविषयी मागदर्शन करुन काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या पालकांना किंवा गुरुजंनाना सांगाव्यात. शाळेच्या या नाविन्य उपक्रमाचे संस्थाध्यक्ष दिलीप बांगर, प्राचार्य रॉबीन वरगीस, संचालक अंजिक्य बांगर यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्मिता नाईक तर आभार अपर्णा बासरकर यांनी केले.

हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने शुक्रवारी येथील स्व शिवाजीराव देशमुख सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत बहारदार नृत्य सादर केले. छाया- सुनील पाठक

संक्षिप्त वृत्त

१८ ऑक्टोबरला सर्व रोग निदान शिबीर

कुरूंदा- डॉक्टर असोसिएशन, कुरुंदा व लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ ते १० वाजेपर्यंत टोकाई गड, कुरुंदा येथे भव्य मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या सामाजिक उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी वसमतचे मेडिकल ऑफिसर डॉ. गंगाधर काळे, डॉ.क्यातमवार, डॉ. सनाउल्ला खान, डॉ. सेलूकर डॉ.वैभव पडोळे, डॉ. मोरे, डॉ. सागर सातपुते, डॉ. मनोज बागल, डॉ. किशोर गुंडेवार, डॉ. हंबर्डे, डॉ. दिग्रस, डॉ. दासरे, डॉ. गोरे आणि डॉ. चिलवंत यांच्यासह नामवंत डॉक्टर उपस्थित राहून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, रक्तदाब तपासणी, डोळ्यांची तपासणी, दातांची तपासणी तसेच आवश्यकतेनुसार इतर तपासण्या व योग्य उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.कुरुंदा व परिसरातील सर्व नागरिकांनी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू रुग्णांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा. शक्य असल्यास यापूर्वीच्या वैद्यकीय तपासण्यांचे अहवाल व नियमित औषधांची माहिती सोबत आणावी. या उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईड व डॉक्टर असोसिएशन, कुरुंदा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कराटे स्पर्धेत अनुष्का अडाणेला सुवर्णपदक

औंढा नागनाथ- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली व हिंगोली जिल्हा स्पोर्टस् कराटे-डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय कराटे क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये श्री शांती निकेतन विद्यालय, शिरड शहापूर येथील विद्यार्थिनी अनुष्का अडाने हिने सुवर्णपदक पटकावले. या यशामुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.अनुष्काला अनिल टाकणखार यांनी कराटेचे प्रशिक्षण दिले. या स्पर्धेत आदित्य उबाळे व गणेश परडे यांनीही सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी क्रीडा शिक्षक चव्हाण, कराटे संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल इसावे, सचिव संतोष नांगरे, विजय डोंगरे, क्रीडाधिकारी प्रवीण कोंडेकर यांच्यासह विविध क्रीडा शिक्षक उपस्थित होते. अनुष्काच्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक काळे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

वाचन प्रेरणा दिन साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोदवड यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'अग्निपंख' या पुस्तकातील निवडक भागांचे वाचन श्रीमती आम्रपाली चोरमारे, वहिदा काजी आणि मंकरणा जाधव यांनी केले. या वाचनातून डॉ. कलाम यांचा संघर्षमय जीवनप्रवास, त्यांची वैज्ञानिक दृष्टिकोनाची जडणघडण आणि देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान यांना उजाळा देण्यात आला.

जिल्हा कचेरीत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १५० विद्यार्थ्यांची २ डी-इको तपासणी, ३० विद्यार्थी शस्त्रक्रियेसाठी संदर्भीत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) आणि सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून हृदयरोगाचा संशय असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे १५ ऑक्टोबर रोजी विशेष २डी-इको तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव या पाच तालुक्यांतील १५५ संशयित हृदयरुग्ण विद्यार्थ्यांपैकी १५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यापैकी ३० विद्यार्थ्यांना हृदयशस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी ठाणे येथील केआयएमएस रुग्णालयातील बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. सोनिया कारापूरकर आणि त्यांच्या पथकाने तपासणी केली. संदर्भित विद्यार्थ्यांवर महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत केआयएमएस रुग्णालय, ठाणे येथे मोफत हृदयशस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना वेळेत निदान आणि उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अधिष्ठाता डॉ. राजहर्ष हनुमंते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक मोरे, बालरोगतज्ज्ञ डॉ. गोपाल कदम, डॉ. सचिन बोधगिरे, डॉ. स्नेहल नगरे यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वितेसाठी जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक लक्ष्मण गाभणे, जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्राचे व्यवस्थापक डॉ. संतोष नांदूरकर, ज्ञानोबा चव्हाण, राजेंद्र खंदारे तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माते, एएनएम, कार्यालयीन कर्मचारी आणि रुग्णालयातील परिचारिकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये हृदयविकाराची लक्षणे आढळल्यास पालकांनी दुर्लक्ष न करता वेळेत वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. आवश्यकतेनुसार २डी-इको तपासणी करून आजाराचे लवकर निदान व उपचार करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी केले आहे.

दसरा महोत्सवात भजन स्पर्धेत श्रीकृष्ण अध्यात्मिक भजनी मंडळाने मारली बाजी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

येथील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीद्वारा आयोजित भजन स्पर्धेत चाळीसावर मंडळांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी श्रीकृष्ण अध्यात्मिक शिक्षण संस्था भजनी मंडळाने प्रथम क्रमांक मिळवित बाजी मारली आहे.

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने हॉटेल शिवलिला सभागृहात गुरुवार दि. १५ ऑक्टोबर रोजी भजन स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन श्रीमती मायाताई वानखेडे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीनिवास लांडगे, हिंगोली वकील संघाचे अध्यक्ष ॲड. श्रीधर घुगे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सेवानिवृत्त तहसीलदार मधुकरराव खंडागळे, योग शिक्षक नरसिंगराव देशमुख यांची उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी परिक्षक संगित अलंकार रमाकांत पैंजने व संगित विशारद काशिनाथ नागठाणे यांची उपस्थिती होती. भजन सत्तावीस भजनी मंडळांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत श्रीकृष्ण अध्यात्मिक शिक्षण संस्था या भजनी मंडळाने १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले, ७ हजार रुपयांचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कवळे गुरुजी भजनी मंडळ व कल्याणी सुरताल भजनी मंडळ यांना विभागुन देण्यात आले. ४ हजार रुपयांचे तृतिय क्रमांकाचे संतसेना भजनी मंडळ यांना देण्यात आले. तर १ हजार रुपयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक साईबाबा भजनी यांना देण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी संयोजक आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीचे अध्यक्ष कल्याण देशमुख, सयोजन समितीचे प्रमुख मधुकर खंडागळे यांनी परिश्रम घेतले.

शिवाजी महाविद्यालयात जागर आरोग्याचा- मुख्यमंत्री संवाद उपक्रम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ ऑक्टोबर

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली यांच्यावतीने व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायत्ता कक्ष हिंगोली यांच्या समन्वयाने शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे 'जागर आरोग्याचा - मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने राज्यभर 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद'जागर आरोग्याचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी मानसिक आरोग्य, परीक्षेचा ताण, चिंता व नैराश्य, व्यसनांचे दुष्परिणाम, संतुलित आहार, व्यायाम, झोप तसेच लैंगिक व प्रजनन आरोग्याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच आरोग्याबाबत सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमात सदाशिव तनपुरे, डॉ. शाम गबारे व दत्तराज मगर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य राखण्याची शपथ घेतली. या उपक्रमात एकूण ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळीमहाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

माहूर घाटातील दरीत टेम्पो कोसळला यवतमाळच्या तीन भाविकांचा मृत्यू

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १६ ऑक्टोबर -

माहूर गडावर नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याने देशभरातून भाविक मिळेल त्या वाहनाने गडावर येऊन दर्शन घेत आहेत यवतमाळ येथील सहा भाविक टेम्पो द्वारे दि १५ रोजी रात्री १२.०० वाजता माहूर येथे पोहोचले त्यांनी श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन परत यवतमाळ येथे जात असताना माहूर घाटातील पहिल्या घातक वळणावर समोरून येणाऱ्या वाहनाचा उजेड डोळ्यावर पडल्याने चालकाचा तोल जाऊन टेम्पो थेट १०० खोल दरीत कोसळल्याने झालेल्या अपघातात टेम्पोतील मागील डाल्यात बसलेले तिघेजण खोलदरीत दगडावर आदळल्याने त्यांच्या डोक्यांना व इतर अवयवांना गंभीर दुखापती झाल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला तर एकाचा उपचार सुरू असताना रुग्णालयात मृत्यू झाला चालकासह केबिनमध्ये बसलेल्या इतर दोघांना किरकोळ मार लागला. ही घटना दि १६ रोजी सकाळी ५.०० वाजता घडली.

यवतमाळ येथील बोरा डिजिटल आय एफ बी पॉईंट अप्सरा टाकीज जवळ यवतमाळ येथील सहा कामगार दुकानदाराचा मॅक्झिमो जितो हा छोटा टेम्पो क्र चक२९ इए ६८५९ ने दि १५ रोजी रेणुका देवी येथे रात्री १०.३० ते अकराच्या दरम्यान निघाले माहूर गडावर बारा वाजता पोहोचून दर्शन आणि येथील कार्यक्रम आटोपून ते सकाळी पाच वाजता परत निघाले सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या मागील पहिल्या घातक वळणावरुन जात असताना समोरून वाहनाचा उजेड पडल्याने तसेच समोरचे वाहन विरुद्ध दिशेने आल्याने

चालकाने मोकळ्या जागेत टेम्पो वळवला परंतु बॅलन्स बिघडल्याने थेट वळणाच्या किनाऱ्यावर कठडे संरक्षक भिंत नसल्याने शंभर फूट खोल दरीत जाऊन कोसळला. झालेल्या अपघातात चालक प्रतीक अरविंद अडकिने वय २६ वर्ष व इतर दोघे दत्ता मनोहर मश्राम वय ३५ यशवंत अरविंद पाटील वय २५ तिघे राहणारे यवतमाळ यांना किरकोळ मार लागला तर टेम्पोच्या मागे डाल्यात बसलेले तिघे बाबाराव ज्ञानोबा टेकाम वाय ६० वर्षे राहुल सुधाकरराव ठाकरे वाय २५ वर्षे प्रीतम रामराव प्रधान व ३८ वर्ष तिघे राहणार यवतमाळ हे उसळून दगडावर आदळले गेल्याने तसेच त्यांचे अंगावर दगड आणि टेम्पो पडल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीर अवस्थेत होता. सदरील माहिती भाविकांनी ११२ वर सांगितल्यानंतर गस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, पोकॉ पवन राऊत यांना कळविल्याने यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन ४ जखमींना उपस्थितांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालयात पोहोचवले. येथे उपचार सुरू असताना बाबाराव टेकाम यांचा मृत्यू झाला तर दोघांचे शव तेथेच पडून होते. पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी पत्रकार इलियास बावाणी पत्रकार गोपाल चव्हाण यांच्या मदतीने दोन्ही शव वर काढून ग्रामीण रुग्णालयात पोहचवले तर शारदा कंट्रक्शन चे सुपरवायझर श्रीनिवास यांनी तात्काळ क्रेन उपलब्ध करून दिल्याने टेम्पो बाहेर काढण्यात आला आहे.

एका जखमीचा ग्रामीण रुग्णालयात मृत्यू झाल्याचे डॉ. बिपिन बाभळे यांनी जाहीर केल्याने अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. यावेळी रुग्णालयाच्या आधीपरिचारिका एस.बी. बोथिंगे ,दत्ता पालटवाड, एस कुंठेकर, आर श्रीमंगले, पी. आर. जुडे, जी.आर. भोपाळे, अमृता कऱ्हाळे, गणेश धुळगंडे यांचे सह १०८ च्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ सेवा देत जखमींवर उपचार करून शवविच्छेदन केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांनी घटनास्थळी भेट दिली असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी शरद घोडके, पोहेकॉ सत्यमल मडावी, पोकॉ संघरत्न सोनसळे, पोकॉ पवन राऊत, होमगार्ड एस. पी. भगत, मुरकुटे यांच्यासह पोलीस तपास करत आहेत.

संचमान्यता प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शिक्षण विभागाचे शाळांना निर्देश

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १६ ऑक्टोबर -

सन २०२६ च्या संचमान्यता प्रक्रियेतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हा परिषद नांदेडच्या प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. संचमान्यता पोर्टलवरील माहिती विहित मुदतीत अद्ययावत करून फॉरवर्ड करण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र, अद्याप अनेक शाळांची माहिती प्रलंबित असल्याने प्रशासनाने आता मिशन मोडवर काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

संचमान्यता पोर्टलवरील 'डिव्हिजन एड' टॅबमधील माहिती अद्याप पूर्णपणे फॉरवर्ड करण्यात आलेली नाही. मागील दोन दिवसांत केवळ १०० शाळांची माहिती फॉरवर्ड झाली असून, ५०६ शाळांची माहिती अद्याप प्रलंबित आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांचा डेटा फॉरवर्ड होणार नाही आणि शाळांना संचमान्यता मिळणार नाही. परिणामी, पुढील महिन्याचे वेतन मिळण्यास अडचण निर्माण होऊ शकते, असा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.

तसेच, जिल्हा परिषद शाळांच्या तुकडी आदेशासाठी रिपोर्ट कार्डची स्वाक्षरी केलेली प्रत अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, विद्यार्थ्यांचा डेटा फॉरवर्ड करण्याची प्रक्रियाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. अद्याप १,१५७ शाळांचा विद्यार्थी डेटा प्रलंबित असल्याने संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन ही कामे आजच कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश प्राथमिक विभागाचे शिक्षण अधिकारी वंदना फुटाणे यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी यांना दिले आहेत.

सातव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम रोखली ; आत्मदहनाचा इशारा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १६ ऑक्टोबर -

सातव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम मिळावी, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याचा आरोप करत जिल्हा परिषदेचे माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यू. ए. कोमवाड यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. येत्या २३ किंवा २४ ऑक्टोबरपर्यंत योग्य निर्णय न झाल्यास आत्मदहन करणार असल्याचे त्यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

कोमवाड यांनी २०१४ मध्ये माळेगाव यात्रेसाठी घेतलेल्या २० लाख रुपयांच्या अग्रिम रकमेतून २० लाख २ हजार ५९ रुपये खर्च झाल्याचे आणि समायोजनाची संचिका सादर केल्याचे निवेदनात नमूद केले आहे. समायोजन प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने अग्रिम रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून, त्यांच्या घरावर बोजा चढविण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. या प्रकरणी त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

दरम्यान, अग्रिम रकमेच्या वसुलीचा विषय आणि सातव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम हे स्वतंत्र विषय असतानाही डिसेंबर २०२५ पासून वेतनाची फरकाची रक्कम रोखण्यात आल्याचे कोमवाड यांनी म्हटले आहे. यासाठी त्यांनी अनेकदा निवेदने देऊन तसेच सत्याग्रह करूनही प्रश्न सुटलेला नसल्याने ६ ऑक्टोबरपासून जिल्हा परिषदेसमोर अर्धनग्न अवस्थेत भिक्षा मागो सत्याग्रह सुरू केला आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दिव्यांग निराधारांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. १६ ऑक्टोबर -

मुदखेड तालुक्यातील दिव्यांग व निराधार लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवताना विलंबाचा सामना करावा लागत असल्याने प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात तहसीलदारांना निवेदन देऊन प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची प्रहार संघटनेची मागणी

योजनेअंतर्गत दाखल केलेल्या अर्जांच्या फाईली मंजूर होण्यासाठी सात ते आठ महिने, तर काही प्रकरणांत वर्षभर प्रतीक्षा करावी लागत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

प्रलंबित अर्जांचा दरमहा निपटारा करावा, पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी माहिती फलकावर प्रसिद्ध करावी आणि मंजुरी मिळूनही लाभ न मिळालेल्या लाभार्थ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्या संघटनेने केल्या आहेत.

प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास तहसील कार्यालयावर बेशरम मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी प्रहार महिला तालुकाध्यक्ष सौ. केशरताई शिंदे पाटील, प्रहार भावी जिल्हाध्यक्ष अनिल शेटे पाटील, प्रहार शिवसेना संघटनेचे अध्यक्ष शंकरराव शिंदे पाटील, मुगट सर्कल प्रमुख रामराव पावडे, प्रहार तालुका सचिव साहेबराव निवडंगे यांच्यासह प्रहार मित्रमंडळाचे सदस्य व महिला उपस्थित होते.

किनवटमधील रोहित्र टेस्टिंग युनिटच्या मागणीची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून दखल

तभा वृतसेवा
किनवट, दि. १६ ऑक्टोबर -

किनवट येथे महावितरणचे स्वतंत्र रोहित्र टेस्टिंग व वाटप युनिट सुरू करण्याबाबत आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीची मुख्यमंत्री कार्यालयाने दखल घेतली आहे. या प्रस्तावाची तपासणी करून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत.

किनवट व माहूर या आदिवासीबहुल आणि दुर्गम तालुक्यांतील नादुरुस्त रोहित्रांची दुरुस्ती स्थानिक पातळीवर केली जाते. मात्र, दुरुस्त

रोहित्रांचे टेस्टिंग व वाटप करण्यासाठी ते भोकर येथील विभागीय कार्यालयात न्यावे लागतात. किनवटपासून भोकरचे अंतर सुमारे १०० ते १२५ किलोमीटर असल्याने रोहित्रांची ने-आण करण्यासाठी वेळ आणि खर्च वाढतो. परिणामी, दुरुस्ती झाल्यानंतरही रोहित्रांचे वाटप होण्यास विलंब होतो.

याचा फटका कृषिपंपांच्या वीजपुरवठ्याला बसत असून शेतकऱ्यांच्या सिंचनासह गावांतील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवरही परिणाम होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी किनवट येथेच स्वतंत्र रोहित्र टेस्टिंग व वाटप युनिट सुरू करण्याची मागणी आमदार केराम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली होती.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून तातडीच्या कार्यवाहीच्या सूचना

आमदार केराम यांनी मांडलेल्या स्थानिक अडचणींची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने संबंधित विभागाला प्रस्ताव तपासून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे किनवट व माहूर तालुक्यांतील रोहित्र दुरुस्तीपश्चात तपासणी आणि वाटपाची प्रक्रिया स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या सूचनांमुळे या प्रश्नाच्या निराकरणासाठी प्रशासकीय स्तरावर पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा झाला असून, आता संबंधित विभागाकडून प्रत्यक्ष निर्णय आणि अंमलबजावणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मूल्यसंस्कारांतून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास; नायगाव-नरसी केंद्रांची संयुक्त परिषद उत्साहात

तभा वृतसेवा
नायगाव, दि. १६ ऑक्टोबर -

विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्यांची रुजवणूक करून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने नायगाव आणि नरसी केंद्रांची संयुक्त मूल्यवर्धन शिक्षण परिषद गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खंडगाव येथे उत्साहात संपन्न झाली.

या परिषदेत सुप्रसिद्ध साहित्यिक वीरभद्र मिरेवाड यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद करताना, वाचनातून मनः शांती, समाधान आणि ज्ञानाची प्राप्ती होते, असे प्रतिपादन केले. आजच्या धावपळीच्या जीवनात वाचन व्यक्तीला सकारात्मक विचारांची दिशा देते, असे त्यांनी आपल्या ओघवत्या आणि विनोदी शैलीतून स्पष्ट केले.

कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी उद्धव ढगे, नरसी केंद्राचे केंद्रप्रमुख कपिलेश्वर नलबलवार आणि नायगांव केंद्राचे उमाकांत डिंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रास्ताविक उमाकांत डिंगणे यांनी केले, तर उद्धव ढगे आणि कपिलेश्वर नलबलवार यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यवर्धन उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले.

सुलभक सय्यद जावेद यांनी पीपीटी सादरीकरण आणि व्हिडिओच्या माध्यमातून मूल्यवर्धन उपक्रमांची कार्य पद्धती स्पष्ट केली. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, सहकार्य, जबाबदारी आणि सामाजिक जाणीव विकसित करण्यासाठी उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी कशी करावी, याबाबत

त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्ययन निष्पत्ती, गटकार्य, सहाध्ययन, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि वर्गव्यवस्थापन या विषयांवरही चर्चा झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर बारडे यांनी केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष बेळकोणे, सरपंच आनंदराव पा. डूमणे, उपसरपंच सुरेश पा. कदम, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष माधवराव पा. जोनकले, माजी सरपंच अविनाश पा. कदम, एम. जे. कदम, वेंकट जाधव, पर्यवेक्षक बाळासाहेब पांडे आणि मुख्याध्यापक पांडुरंग कोतेवार उपस्थित होते.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी खंडगाव शाळेचे मुख्याध्यापक उत्तम वडजे, नंदकुमार जाकापुरे, सुभाष चव्हाण, टाकळीचे मुख्याध्यापक बोईलवाड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या

परिषदेमुळे नायगांव आणि नरसी केंद्रांतील शिक्षकांना शैक्षणिक अनुभवांची देवाणघेवाण करून मूल्याधिष्ठित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नवी दिशा मिळाली.

सेवा संकल्प अभियानांतर्गत निबंध, रांगोळी स्पर्धेचे आयोजन

हदगाव -भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळ, हदगाव व नांदेड उत्तर जिल्ह्याच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत हदगाव तालुक्यातील

निवघा बाजार येथील श्री गंगाराम पाटील हायस्कूल येथे निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपा हदगाव पश्चिम मंडळाचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत हनवते यांनी दिली. केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध जनकल्याणकारी योजना याची माहिती व लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावे हे हेतू ठेवूनच सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. सदरील रांगोळी व निबंध स्पर्धेच्या कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता भाजपा हदगाव पश्चिम मंडळाचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत हनवते, प्रभारी सौ. लताताई फाळके, जिल्हा सचिव सुप्रियाताई मुनेश्वर, सरचिटणीस अवधूत कदम, उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, बूथ प्रमुख देवानंद महाजन तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या उपक्रमासाठी विद्यालयातील शिक्षक वृंद घोरबांड सर, माटाळकर सर, कलुरकर सर, एस. बी. सूर्यवंशी सर, चंद्रशेखर कदम सर यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

उमरीत नवरात्रमोहत्सव निमित 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन

उमरी -शहरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजन केडी बॉस भव्य दांडिया महोत्सव २०२६ आज, शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा, सन्मान नारी शक्तीचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गोरठेकर कॉम्प्लेक्ससमोर, मोंढा मैदान, उमरी येथे होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सौ. जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर यांच्या

पुढाकारातून करण्यात आले आहे. संदीप जाधव सर प्रस्तुत या कार्यक्रमात झी टॉकीजचे मिमिक्री आर्टिस्ट विविध मनोरंजक कार्यक्रम सादर करणार आहेत. यासोबतच महिलांसाठी खेळ पैठणीचा, विविध मनोरंजक खेळ, लकी ड्रॉ स्पर्धा आणि आकर्षक बक्षिसे अशी अनेक खास आकर्षणे असणार आहेत. दरम्यान, दि. ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत केडी बॉस भव्य दांडिया महोत्सवांतर्गत दररोज दांडिया स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवामुळे उमरी शहरासह परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण उमरी शहर व परिसरातील सर्व माता-भगिनींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कार्यक्रमाच्या आयोजिका सौ. जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर यांनी केले आहे.

अनुसूया शावजी ढगे पाटील ॲग्रो प्रा. लि.चा ऊस दर जाहीर

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. १६ ऑक्टोबर -

मुदखेड तालुक्यातील पिंपळकौठा (मगरे) येथील अनुसूया शावजी ढगे पाटील ॲग्रो प्रा. लि.च्या वतीने चाचणी गळीत हंगाम २०२६-२७ निमित्त उमरी तालुक्यातील शेलगांव येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात ऊसदर जाहीर करण्यात आला. यामध्ये बिगर सभासद शेतकऱ्यांना प्रतिटन ३,५०० रुपये, तर सभासद शेतकऱ्यांना प्रतिटन ३,८०० रुपये दर देण्याची घोषणा संस्थापक अध्यक्ष दादाराव शावजी ढगे पाटील यांनी केली.

दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शेलगांव येथे आयोजित या मेळाव्यात दादाराव ढगे पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना 'शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल,' असा संदेश

दिला. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा, या उद्देशाने कारखान्याच्या वतीने ऊसदर जाहीर करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलास देशमुख गोरठेकर, शेतकरी संघटनेचे नेते डॉ. भगवानराव मनुरकर आणि शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष माधवराव पाटील पुयड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून चेअरमन ओंकार दादाराव ढगे पाटील आणि कार्यकारी संचालक शेख ए. एम. वाघलवाडेकर यांनी जबाबदारी सांभाळली.

चाचणी गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या शेतकरी मेळाव्याला परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. ऊसदराच्या घोषणेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांचे आर्थिक हित, शेतीची प्रगती आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी कारखान्याच्या वतीने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे उपस्थितांनी स्वागत केले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेला दर आणि शेतकरी हिताला दिलेले प्राधान्य यामुळे अनुसूया शावजी ढगे पाटील ॲग्रो प्रा. लि.च्या या मेळाव्याची परिसरात चर्चा सुरू आहे.

विविध फायनान्स कंपनीची वसुली तात्काळ थांबवा : परमेश्वर जाधव

तभा वृतसेवा
कंधार, दि. १६ ऑक्टोबर -

आज तारखेत मराठवाड्यासह नांदेड जिल्हा व कंधार तालुक्यावर कोरड्या दुष्काळामुळे भयावह परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी शेतमजूर व सर्वसामान्य जनतेसमोर उदरनिर्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि यावर्षी कोरडा दुष्काळ यामुळे शेतकरी दुहेरी संकटात असताना देखील अशा कठीण परिस्थितीत आरबीआय अंतर्गत येणाऱ्या खाजगी फायनान्स कंपन्या घरोघरी जाऊन हप्ता वसूल करण्यासाठी तगादा लावत असून हप्ता नाही भरल्यास तुमचे सिविल खराब करण्यात येईल अशी मजोर भाषा वापरत असलेल्याच्या तक्रारी येत आहेत. ही वसुली तात्काळ थांबवण्यात यावी अशी मागणी तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार श्री रामेश्वर गोरे साहेब यांच्याकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सरकारने कर्ज वसुली थांबवण्याच्या सूचना दिल्या असताना देखील फायनान्स कंपन्या वसुलीसाठी दबाव टाकत असल्याचे तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांनी म्हटले आहे. अशा प्रकारच्या दबावामुळे शेतकरी

शेतमजूर व सर्वसामान्य जनतेस त्रास सहन करावा लागत आहे. चोला फायनान्स, महिंद्रा फायनान्स ,बजाज फायनान्स, श्रीराम फायनान्स, मनिपुरम फायनान्स ,ग्रामीण कोटा फायनान्स,हिंदुजा फायनान्स,आयडीएफसी फायनान्स ,फाईव्ह स्टार फायनान्स, ग्रामशक्ती फायनान्स, आय फायनान्स,गोदरेज फायनान्स आयटीआय फायनान्स,फास्ट भारत फायनान्स ,वेल स्टार फायनान्स ,आशीर्वाद फायनान्स, अन्नपूर्णा फायनान्स, साउथ इंडिया फायनान्स, मोतीलाल ओसवाल फायनान्स,मास वंडर सह विविध फायनान्सने तालुक्यात होम लोन ,बचत गट लोन, बिजनेस लोन ,पर्सनल लोन ,कंजूमर लोन, गोल्ड लोन ,क्रॉप लोन ,वाटप केले असून सदरील लोन साठी पंधरा दिवसाचा व तीस दिवसाचा मासिक हप्ते दिले आहेत. मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे पिके वाळून गेल्यामुळे शेतकरी व हाताला काम नसल्यामुळे शेतमजूर व सर्वसामान्य जनता आर्थिक संकटात सापडली आहे यामुळे संबंधित फायनान्सची वसुली तात्काळ थांबून सर्वसामान्य जनतेस न्याय द्यावा असे निवेदन कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्याकडे देण्यात आले असून जनतेस त्रास झाल्यास फायनान्स कंपनीच्या वसुली एजंटला शिवसेना स्टाईलने उत्तर देण्यात येईल असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर शिवसेना तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव, तालुका संघटक पंडित देवकांबळे ,उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पवार, उप शहर प्रमुख निलेश मोरे ,चेअरमन जीएम पवळे ,लक्ष्मण गायकवाड, जगन्नाथ जाधव ,संदीप गडंबे, सचिन तेलंग, मारुती जाधव, लहूदास जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.